| | 150.4.6<br>वि.स.बैठक<br>4.3.6 | परीक्षेच्या उत्तर पुस्तिका, प्रश्नपत्रिका तसेच पाठ्यपुस्तके पोस्टामार्फत पाठविण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देणेबाबत......<br>(टिपणी: विद्यापीठाचे परीक्षा साहित्य तसेच पाठ्युपुस्तके इ. यापूर्वी स्वतंत्र वाहनाने महाराष्ट्र भरातील अभ्यास/परीक्षा केंद्रांवर विभागीय केंद्रांमार्फत पाठविण्यात येत होते. यात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर खर्च होऊन हे साहित्य पोहोचण्यास मोठा कालावधी लागत असे. सन 2015 च्या उन्हाळी परीक्षांपासून हे साहित्य पोस्टाची मदत घेऊन पाठविण्यात आले होते. पोस्टाकडे असलेल्या नेटवर्कमुळे हे साहित्य सर्व केंद्रांवर वेळेत पोहोचल्याचे लक्षात आले असून त्यास कार्योत्तर मंजूरी मिळावी व यापुढेही याच पद्धतीने साहित्य पाठविण्यास मंजूरी मिळावी.) (सहपत्र-G)<br>**वि.स.ठराव-** परीक्षेच्या उत्तर पुस्तिका, प्रश्नपत्रिका तसेच पाठ्यपुस्तके पोस्टामार्फत पाठविण्यास मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व त्यास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.7<br>वि.स.बैठक<br>4.3.7 | सन 2015-16 च्या जाहिरात प्रसिद्धीसाठी अंदाजे रु.33,76,000/- खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.....<br>(टिपणी: 2015-16 चा प्रसिद्धी कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या वर्षाच्या जाहिरातीसाठी मे.वत्सदा जाहिरात व जनसंपर्क या संस्थेस अधिकृत मान्यता देण्यात आलेली आहे. वृत्तपत्रातून मुद्रित, दूरचित्रवाणीच्या माध्यमातून दृकश्राव्य व आकाशवाणीच्या माध्यमातून श्राव्य |

| | | |
|---|---|---|
| | | जाहिराती करण्याचे धोरण आखण्यात आले आहे. यासाठी अंदाजे खर्च रु.33,76,000/- खर्चास मा.कुलगुरू यांनी मंजूरी दिलेली आहे, त्यास कार्योत्तर मंजूरी मिळावी.) (सहपत्र-H)<br>**वि.स.ठराव-** सन 2015-16 च्या जाहिरात प्रसिद्धीसाठीच्या खर्चास मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व रु.33,76,000/- च्या खर्चास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>व्य.मं.ठराव : **वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.8<br>वि.स.बैठक<br>4.3.8 | 1) विद्यापीठातील Campus wide Networking करिता सध्याचे Nortel Switches बदली करुन नवीन Managed Layer 2 10/100/1000 based Gigabit Switches खरेदी करण्यास आणि खरेदी करिता येणाऱ्या अंदाजे रु. 14,54,680/- इतक्या खर्चास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे, रु. 14,54,680/- इतक्या खर्चाच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर. ( सहपत्र- I )<br>2) विद्यापीठातील एकूण 6 HP-Servers-MPE-7530 साठी देखभाल करार (Annual Maintenance Contract) तीन वर्षांकरिता करण्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. 15,48,000/- इतक्या खर्चास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. रु. 15,48,000/- इतक्या खर्चाच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर. (सोबत सहपत्र-I)<br>3) विद्यापीठातील विद्यार्थी प्रवेश अर्ज Online पद्धतीने नोंदणी, तपासणी, दुरुस्ती साठी संगणक, प्रिंटर, U.P.S. खरेदी करण्यास आणि खरेदी करिता येणाऱ्या अंदाजे रु. 30,75,000/- इतक्या खर्चास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. रु. 30,75,000/- इतक्या खर्चाच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर. (सहपत्र-I)<br>**वि.स.ठराव-** विद्यापीठातील Campus wide Networking करिता रु.14,54,680/-, विद्यापीठातील एकूण 6 HP-Servers-MPE-7530 साठी देखभाल करार (Annual Maintenance Contract) तीन वर्षांकरिता रु. 15,48,000/- तसेच प्रवेश अर्ज Online पद्धतीने नोंदणी, तपासणी, दुरुस्ती साठी लागणाऱ्या संगणक, प्रिंटर, U.P.S. खरेदी करण्यास रु. 30,75,000/- खर्चास मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व त्यास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>व्य.मं.ठराव: **वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.9<br>वि.स.बैठक<br>4.3.9 | सन 2016-17 पासून विद्यापीठातील सर्व शिक्षणक्रमांची 100 टक्के फी जमा करणेबाबत...<br>(टिपणी : वित्त समितीच्या दि. 21.3.2014 च्या बैठकीतील ठराव क्र. डी-300/13-14/4 अन्वये तसेच वित्त समितीच्या सदर शिफारशीस मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. 26/03/2014 च्या बैठकीतील ठराव क्र. ए-100/14/09 अन्वये सन 2015-16 या वर्षापासून शिक्षणक्रमनिहाय फी मधील अभ्यासकेंद्रांच्या हिस्स्याची रक्कम परस्पर न घेता विद्यापीठ हिस्सा व अभ्यासकेंद्र हिस्सामिळून 100% फी ही विद्यापीठात आधी जमा करावी असे ठरले आहे. परंतु 2015-16 पासून सर्व शिक्षणक्रमांची प्रवेश प्रक्रिया Online सुरू आहे. वरील कार्यवाही करतांना MKCL च्या सॉफ्टवेअरमध्ये सुधारणा करून अभ्यासकेंद्रांच्या हिस्स्याची रक्कम अदा करण्यासाठी यंत्रणाही उभी करावी लागणार आहे. तसेच या वर्षी लेखाविभागाचे सॉफ्टवेअर नवीन असून पेमेंट गेट-वे ही सिस्टीमही नवीन आहे. त्यामुळे या वर्षी वरीलप्रमाणे 100% फी विद्यापीठात जमा करून अभ्यासकेंद्रांच्या हिस्स्याची रक्कम अदा करणे शक्य नाही. सन 2014-15 या वर्षासाठी पूर्वीप्रमाणेच फक्त विद्यापीठ हिस्सा जमा करावा व अभ्यास केंद्र हिस्सा विद्यार्थ्याने परस्पर अभ्यास केंद्राकडे जमा करावा. मात्र पुढील वर्षी सन 2015-16 पुरेसा कालावधी असल्याने तसेच आताची प्रवेश प्रक्रिया, पेमेंट गेट-वे तसेच लेखा विभागाच्या सॉफ्टवेअरमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास त्या दूर करणे शक्य असल्याने 2016-17 या वर्षापासून सर्व शिक्षणक्रमांची 100% फी विद्यापीठात जमा करण्यास मा.कुलगुरूंनी मंजूरी दिली असून त्यास वरीलप्रमाणे 100% फी 2016-17 पासून जमा करण्यासाठीचा विषय वित्त समितीच्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेस्तव ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे. (सहपत्र - J )<br>**वि.स.ठराव-** सन 2016-17 पासून सर्व शिक्षणक्रमांची 100 टक्के फी थेट विद्यापीठात जमा करण्याच्या प्रस्तावास मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व त्यास कार्योत्तर |

| | | |
|---|---|---|
| | | मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.10<br>वि.स.बैठक<br>4.3.10 | आय.टी.आय. प्रशिक्षणार्थींना वाढीव विद्यावेतन अदा करण्यास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत....<br>(टिपणी : अंशकालीन प्राचार्य, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सातपूर, नाशिक यांनी कळविल्यानुसार शासनाच्या राजपत्रानुसार सुधारित विद्यावेतन आयटीआय प्रशिक्षणार्थींना इतर ठिकाणी लागू करण्यात आले असून विद्यापीठानेही ते लागू करावे असे कळविले आहे. त्यानुसार विद्यापीठातील सध्या कार्यरत असलेल्या व सन 2013-14 च्या बॅच मधील आयटीआय प्रशिक्षणार्थींना शासनाच्या राजपत्रानुसार सुधारित विद्यावेतन पूर्वलक्षी प्रभावाने अदा करण्यास व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा.कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. सदर विषय वित्त समितीसमोर मंजूरीस्तव सादर. तसेच यानंतर शासनामार्फत वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या (जानेवारी व जुलै मधील महागाई भत्त्याच्या दरानुसार) राजपत्रातील दुकाने व व्यापारी आस्थापना या शिर्षकाखालील अर्धकुशल कर्मचाऱ्यांच्या किमान वेतन दरानुसार (किमान वेतनाच्या 80 टक्के) मा.कुलगुरूंच्या मान्यतेने आयटीआय च्या प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा करण्यात येईल यासही मान्यता देणेबाबत सादर.) (सहपत्र - K)<br>**वि.स.बैठक-** मा.कुलगुरू यांनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली व त्यास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.11<br>वि.स.बैठक<br>4.3.11 | विद्यापीठाच्या 21 व्या पदवीदान समारंभासाठी झालेल्या प्रमाणपत्र दरास व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत....<br>(टिपणी: विद्यापीठाच्या 21 व्या पदवीदान समारंभासाठी तत्कालीन परीक्षा नियंत्रक यांनी गोपनीय प्रिंटरकडून दरपत्रके मागवून टेंडर न करता सर्वात कमी दर असलेल्या म्हणजेच रु.8/- प्रति प्रमाणपत्र या दराने कार्यादेश दिलेला होता. त्यासाठी रु.10,66,600/- खर्च आला होता. त्यास मा.कुलगुरूंची वित्त समिती व व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता घेतली होती. त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी.)<br>( सहपत्र - L)<br>**वि.स.बैठक-** मा.कुलगुरू यांनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली व रु.10,66,600/- च्या खर्चास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी मात्र यापुढे विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून खरेदी करण्यात यावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव : वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता देणेबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.12<br>वि.स.बैठक<br>4.3.12 | दिनांक 5 ते 30 जून 2015 कालावधीत विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या शिक्षणक्रमांच्या परीक्षेसाठी येणाऱ्या रु.30,99,300/- खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.....<br>(टिपणी : विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या सर्व शिक्षणक्रमांच्या परीक्षा 5 ते 30 जून 2015 ह्या कालावधीत आयोजित करण्यात आल्या होत्या. या परीक्षांसाठी एकूण रु.30,99,300/- खर्च अपेक्षित होता. या खर्चास मा.कुलगुरू यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदर खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी) (सहपत्र – M )<br>**वि.स.बैठक-** मा.कुलगुरू यांनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली व रु.30,99,300/- च्या खर्चास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव : वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | | **सखोल चर्चा करण्याचे विषय** |
| | 150.4.13<br>वि.स.बैठक<br>4.4.1 | विद्यापीठाचे नवीन Accounting Software तयार होत असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सन 2015-16 च्या अंदाजपत्रकात लेखाशिर्षांमध्ये वाढ करणे तसेच अंदाजपत्रकीय तरतुदींमध्ये वाढ करणेस मान्यता देणेबाबत... |

| | | |
|---|---|---|
| | | (टिपणी : दिनांक 23 मार्च 2015 रोजी झालेल्या वित्त समितीच्या बैठकीत विद्यापीठाच्या सन 2015-16 च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे. विद्यापीठास कॉमन अकाउंट कोड लागू झालेला आहे व त्यानुसार विद्यापीठ स्वतःचे Financial Accounting Software विकसित करीत आहे. हे काम अंतिम टप्प्यात आलेले असून सन 2015-16 च्या अंदाजपत्रकात सोबत जोडलेल्या परिशिष्टांप्रमाणे काही नवीन लेखा शिर्षांची वाढ करावी लागणार आहे तसेच काही लेखाशिर्षांच्या वित्तीय तरतूदींमध्ये वाढ करावी लागणार आहे. त्यानुसार सन 2015-16 च्या अंदाजपत्रकात दुरुस्ती करण्यास मान्यता मिळावी.) (सहपत्र- N)<br>**वि.स.ठराव-** विद्यापीठाचे नवीन Accounting Software तयार होत असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या विद्यापीठाच्या सन 2015-16 च्या अंदाजपत्रकातील लेखाशिर्षांमध्ये वाढ करण्यास तसेच अंदाजपत्रकीय तरतुदींमध्ये वाढ करण्यास मान्यता देण्यात यावी व त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठाचे नवीन Accounting Software तयार होत असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या विद्यापीठाच्या सन 2015-16 च्या अंदाजपत्रकातील लेखाशिर्षांमध्ये वाढ करण्यास तसेच अंदाजपत्रकीय तरतुदींमध्ये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.14<br>वि.स.बैठक<br>4.4.3 | सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाच्या सर्वच शिक्षणक्रमांच्या प्रवेशाची सर्व प्रक्रिया Online पद्धतीने करण्यात येत आहे त्यादृष्टीने प्रवेश शुल्काच्या तपशिलात तसेच माहिती पुस्तिकेत सारखेपणा असणेबाबत...<br>(टिपणी : विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांचे शुल्क निश्चित करताना प्रत्येक शिक्षणक्रमांचे शुल्क आकारणी वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या तपशिलात करण्यात येत आहे. तसेच माहिती पुस्तिकांमधील तपशिलही वेगवेगळा आहे. यामुळे विद्यार्थी, अभ्यास केंद्र, विभागीय केंद्रांना माहिती मिळण्यात अडचणी येतात. बऱ्याच वेळा तपशिलात स्पष्टपणा नसल्याने कायदेशीर बाबी उद्भवतात, विद्यार्थ्यांचे व विद्यापीठाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे सर्व शिक्षणक्रमांच्या प्रवेश शुल्क तसेच माहिती पुस्तिकांमधील इतर तपशिलात साम्यता असण्याच्या दृष्टिकोनातून मा.कुलगुरूंनी डॉ.वडनेरे, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. या समितीने आपला अहवाल मा.कुलगुरूंना सादर केला. त्यावर दिनांक 14/2/2015 रोजी मा.कुलगुरू, सर्व विद्याशाखा संचालक, वित्त अधिकारी, परीक्षा नियंत्रक, कुलसचिव, विद्यार्थी सेवा विभाग या सर्वांसमवेत बैठक घेऊन प्रत्येक शिक्षणक्रमांचे शुल्क, प्रवेश पद्धती, माहिती पुस्तिका, विद्यार्थ्यांनी छापील पुस्तके न घेतल्यास शुल्कात सुट, कोणत्याही शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षास सरळ प्रवेश (नियमांचे अधिन राहून) मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु.1,500/- आणि तृतीय वर्षास सरळ प्रवेश मिळविण्यासाठी रु.3,000/- इतके शुल्क ठरविण्यात आले. गरीब विद्यार्थी, विद्यापीठ कर्मचारी/पाल्य, अपंग, इ. विद्यार्थ्यांनी शुल्क भरणा करावा व विहित पद्धतीने परतावा करावा. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या भारत सरकार शिष्यवृत्तीबाबत विद्यार्थ्यांनी पूर्ण शुल्क भरणा करावा व शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर नियमानुसार परतावा करणेत यावा, या सर्व बाबतीत साम्यता आणून अंतिमीकिरण करण्यात आले व सन 2015-16 या आर्थिक वर्षापासून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी असे ठरले. सोबत परिशिष्ट जोडलेले आहे. यास मान्यतेस्तव प्रसातव सादर. (सहपत्र-P)<br>**वि.स.ठराव-** वर्ष 2015-16 साठी विद्यापीठातील शिक्षणक्रमांसाठी असलेल्या माहितीपुस्तिका व त्यातील आर्थिक बाबींना व्यवस्थापन मंडळास मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार वर्षे 2015-16 साठी विद्यापीठातील शिक्षणक्रमांसाठी असलेल्या माहितीपुस्तिका व त्यातील आर्थिक बाबींना मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.15<br>वि.स.बैठक<br>4.4.4 | Yash International Centre येथे निरंतर शिक्षण विद्याशाखे अंतर्गत Hospitality /Tourism/Catering क्षेत्रातील तज्ञ संस्थेच्या मदतीने अभ्यास केंद्र सुरु करणेबाबत....<br>(टिपणी: विद्यापीठाने दि. 27.5.15 रोजी वर्तमान पत्रात जाहिरात देवून Hospitality / Tourism / Catering क्षेत्रातील स्टार हॉटेल्स किंवा 2.5 कोटीहून अधिक उलाढाल असलेल्या समकक्ष संस्थांकडून Expression of Interest मागविल्या होत्या. यास अनुसरून सोबत जोडलेल्या परिशिष्टातील संस्थांचे अर्ज प्राप्त झालेले असून त्यांचे बिजनेस मॉडेल आणि तज्ज्ञता पाहून योग्य संस्थेची निवड करावी.) (सहपत्र-Q)<br>**वि.स.ठराव-** अभ्यास केंद्र व Yash Interntional Centre चालविण्यास इच्छुक असलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | निविदाधारक सर्व संस्थांनी सादरीकरण केल्यानंतर या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली व सर्वानुमते ठरविण्यात आले की, सर्व संस्थांनी दिलेल्या प्रस्तावांचा सखोल अभ्यास करून याबाबत निर्णय घेऊन व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन, अभ्यास केंद्र व Yash International Centre चालविण्याची जबाबदारी विद्यापीठाने स्वत: घ्यावी. बाहेरील संस्थाचा विचार करण्यात येऊ नये यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.16<br>वि.स.बैठक<br>4.4.5 | संयोजक- शैक्षणिक (Coordinator Academic) पदनाम करण्यास व रु.25,000/- मानधन देण्यास मान्यता देणेबाबत....<br>(टिपणी: व्यवस्थापन मंडळाच्या दि. 29 नोव्हेंबर 2014 च्या बैठकीतील विषय क्र. 146.4.14 नुसार इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने मान्य केलेल्या दरानुसार व पदानुसार विद्यापीठामध्ये कंत्राटी पद्धतीने पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली. त्यानुसार 6 सॉफ्टवेअर डेव्हलपर व 1 डिझायनर अशा सात करारावरील कनिष्ठ सल्लागार कर्मचाऱ्यांचे तसेच ह्या व्यतिरिक्त कार्यरत असलेल्या 6 कनिष्ठ सल्लागारांचे पदनाम बदलून संयोजक – शैक्षणिक (Coordinator Academic) करण्यास व त्यांना रु.25,000/- मानधन देण्यास मान्यता मिळावी.) (सहपत्र-R)<br>**वि.स.ठराव-** याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन संयोजक - शैक्षणिक (Coordinator Academic) पदनाम करण्यास व रु.25,000/- मानधन दिनांक 1/7/2015 पासून देण्यास मान्यता देण्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार संयोजक - शैक्षणिक (Coordinator Academic) पदनाम करण्यास व रु. 25,000/- मानधन दिनांक 1/7/2015 पासून देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.17<br>वि.स.बैठक<br>4.4.6 | विद्यापीठाने दिलेल्या मार्कशिट, प्रमाणपत्र इ. मध्ये बदल करावयास तसेच Duplicate मार्कशिट, प्रमाणपत्र, मायग्रेशन, Verification इ. साठी प्रत्येकी रु.300/- शुल्क आकारणे. (सहपत्र-S)<br>**वि.स.ठराव-** विद्यापीठाने दिलेल्या मार्कशिट, प्रमाणपत्र इ. मध्ये बदल करावयास तसेच Duplicate मार्कशिट, प्रमाणपत्र, मायग्रेशन, Verification इ. साठी प्रत्येकी रु.300/- शुल्क आकारण्यास मान्यता देणेबाबत व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठाने दिलेल्या मार्कशिट, प्रमाणपत्र इ. मध्ये बदल करण्यास तसेच Duplicate मार्कशिट, प्रमाणपत्र, मायग्रेशन, Verification इ. साठी प्रत्येकी रु.300/- शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.18<br>वि.स.बैठक<br>4.4.7 | सर्व विद्याशाखांतर्गत पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या अभ्यास केंद्रांसाठी प्रोसेसिंग फी निश्चित करणेबाबत.....<br>(टिपणी: सन 2016-17 पासून सर्व विद्याशांतर्गत पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या अभ्यास केंद्र मान्यतेसाठी विना परतावा प्रोसेसिंग फी खालील प्रमाणे आकारण्यात यावी.<br>1) एका विद्याशाखेतील एका शिक्षणक्रमासाठी रु.15,000/-, त्याच विद्याशाखेतील एका पेक्षा अधिक (Multi Programme साठी) रु.20,000/-<br>2) प्रत्येक विद्याशाखेतील शिक्षणक्रमांसाठी स्वतंत्र प्रस्ताव व वरीलप्रमाणे स्वतंत्र फी आकारली जाईल. वरील प्रमाणे शुल्क निश्चितीस्तव मंजूरीस्तव सादर.) (सहपत्र-T)<br>**वि.स.ठराव-** प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रोसेसिंग फी निश्चिती करण्यास मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे एका शिक्षणक्रमासाठी रू. 15,000/- व त्याच विद्याशाखेतील एकापेक्षा अधिक Multi Programme साठी रू. 20,000/- प्रोसेसिंग फी निश्चिती करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.19<br>वि.स.बैठक<br>4.4.8 | अभ्यासकेंद्रांना द्यावयाच्या शुल्का संदर्भात TDS Certificate कर सल्लागारांमार्फत काढण्यास मान्यता देणेबाबत....<br>(टिपणी : पुढील वर्षापासून सर्व शिक्षणक्रमांचे 100 टक्के शुल्क विद्यार्थ्यांकडून विद्यापीठात जमा केले जाणार आहे. हे शुल्क जमा झाल्यानंतर त्यातून अभ्यासकेंद्रांचा मानधनाचा हिस्सा अदा करण्यात येणार आहे. या मानधनावर TDS कपात होऊ नये याकरिता विद्यापीठाचे कर सल्लागार श्री.टाटीया यांचेमार्फत आयकर खात्याकडून TDS माफीचे प्रमाणपत्र घेण्याची जबाबदारी सोपविण्यास व त्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | त्यांना योग्य ते मानधन देण्यास मंजूरीस्तव सादर....)<br>**वि.स.ठराव-** विद्यापीठाचे कर सल्लागार यांना या कामासाठी व विद्यापीठाचे Quarter End Returns भरणेसाठी योग्य ते मानधन देण्यास मा.कुलगुरू यांनी निर्णय घ्यावा, यास व्यवस्थापन मंडळास मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठाचे कर सल्लागार यांना या कामासाठी व विद्यापीठाचे Quarter End Returns भरणेसाठी योग्य ते मानधन देण्याबाबत मा.कुलगुरू यांना अधिकार प्रदान करण्यात आले.** |
| | 150.4.20<br>वि.स.बैठक<br>4.4.9 | विविध शिक्षणक्रम बंद करण्यात आलेले असल्यामुळे या शिक्षणक्रमांची पुस्तके भांडारात अनेक वर्षांपासून पडून आहेत. सदर पुस्तके निर्लेखित करून विक्री करणेबाबत.... (सहपत्र-U)<br>**वि.स.ठराव-** बंद करण्यात आलेल्या शिक्षणक्रमांची पुस्तके निर्लेखित करण्यासाठी एक समिती नियुक्त करून विहित पद्धतीने विक्री करणेबाबत मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार बंद करण्यात आलेल्या शिक्षणक्रमांची पुस्तके निर्लेखित करण्यासाठी मा. कुलगुरु यांनी एक समिती नियुक्त करून विहित पद्धतीने विक्री करण्यास व जे शिक्षणक्रम बंद करण्यात आलेले आहेत. त्या शिक्षणक्रमांच्या अभ्यासक्रमाची पुस्तके निर्लेखित करण्यापूर्वी त्याचा वापर महाराष्ट्रातील इतर पारंपारिक विद्यापीठातील महाविद्यालयांना होत असेल तर त्याप्रमाणे अभ्यासक्रम पुस्तकांची यादी पारंपारिक विद्यापीठांना कळवून त्यांना आवश्यक असल्यास सदरील पुस्तके पाठविण्यात यावी. यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.21<br>वि.स.बैठक<br>4.4.10 | प्रश्नपेढी डेटा एन्ट्री व मुद्रीत शोधनाच्या दरास मान्यता मिळणेबाबत.....<br>(टिपणी : विविध शिक्षणक्रमांच्या प्रश्नपेढी विकसित केल्यानंतर Online किंवा Offline परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार केल्या जातात. या प्रश्नपत्रिकेची निर्मिती करण्यासाठी प्रश्नपेढीतील प्रश्नांना सॉफ्टवेअर मध्ये एन्ट्री करावी लागते व त्यानंतर मुद्रित शोधन करण्यात येते. सदर प्रश्न डेटा एन्ट्री साठी चार रुपये प्रति प्रश्न व मुद्रित शोधन (Proof Reading) यांचे साठी एक रु. या प्रमाणे मानधन दरास मान्यता मिळावी.( सहपत्र-V)<br>**वि.स.ठराव-** प्रश्नपेढी डेटा एन्ट्रीसाठी रु. 4/- व मुद्रीत शोधनाच्या दरासाठी रु. 1/- दरास मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार प्रश्नपेढी डेटा एन्ट्रीसाठी रु. 4/- व मुद्रीत शोधनाच्या दरासाठी रु. 1/- दरास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.22<br>वि.स.ठराव<br>4.5.1 | विद्यापीठाचे विविध बँकांमध्ये असलेल्या एकूण 33 खात्यांपैकी वापरात नसलेले खाते बंद करणे बाबत.....<br>(टिपणी: विद्यापीठाचे अंतर्गत लेखापाल श्री.संकपाळ कुलकर्णी अँण्ड असोसिएटस यांनी विद्यापीठाचे अंतर्गत लेखा परीक्षणात सूचना केल्यानुसार विद्यापीठाचे विविध बँकांमध्ये एकूण 33 खाती असून त्यापैकी बहुतेक खाते वापरात नाहीत. त्यामुळे ही वापरात नसलेली खाती बदं करणे बाबत निर्णयार्थ सादर (सोबत यादी)....<br>**वि.स.ठराव-** विद्यापीठाच्या अंतर्गत लेखापालांनी त्यांचे अहवालात नमूद केल्यानुसार विविध बँकांमध्ये असलेल्या एकूण 33 खात्यांपैकी वापरात नसलेले खाते बंद करावेत यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यापीठाच्या अंतर्गत लेखापालांनी त्यांचे अहवालात नमूद केल्यानुसार विविध बँकांमध्ये असलेल्या एकूण 33 खात्यांपैकी वापरात नसलेले खाते बंद करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.23<br>वि.स.ठराव<br>4.5.2 | डॉ.अनुराधा देशमुख व डॉ.एन.आर. शिंदे यांच्या अर्जित रजेच्या रोखीकरणाबाबत.....<br>(टिपणी: शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र.उशिसं / 2008 / जवि / पुणे / 33021 / टेयक्र.4 /न्या.क./8440 दि. 24.10.2008 नुसार उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांच्या आदेश क्र. न्यायापर-2007/(42/07)/विशि-4 दि. 7.10.2008 च्या आदेशानुसार दीर्घ सुट्टी शिक्षकांना अर्जित रजा देय ठरत नाहीं असे कळविले आहे. त्यानुसार डॉ.अनुराधा देशमुख व डॉ.एन.आर. शिंदे यांच्या अर्जित रजेच्या रोखीकरणाबाबत निर्णयार्थ सादर.) (सहपत्र-W)<br>**वि.स.ठराव-** याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन अशाप्रकारे अर्जित रजेचे रोखीकरण करता येणार नाही यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले. |

81

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार शिक्षकांच्या अर्जित रजेचे रोखीकरण करता येत नाही. यास मान्यता देण्यात आली.** |
| | वि.स.ठराव 4.5.3 | अतिप्रदान झालेल्या विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अतिप्रदानाच्या वसुलीबाबत (टिपणी – 6 व्या वेतन आयोगाच्या नियमानुसार केलेल्या वेतन निश्चिती तपासताना मा.सहसंचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्या कार्यालयाकडून काही अधीकारी व कर्मचाऱ्यांना अतिप्रदान करण्यात आले असल्याने ते अतिप्रदान वगळून नव्याने वेतन निश्चिती करावी असे सांगण्यात आले आहे. यात एकूण १२ अधिकारी कर्मचारी असून या व्यतिरिक्त विद्यापीठातील अजूनही काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पूर्वीच्या सेवेतील वेतन संरक्षित करण्यास शासनाची मान्यता घेतलेली नसल्याने त्यांच्या वेतन पडताळीत त्रुटी उदभवल्यास अशा प्रकारची अतिप्रदानाची वसून निघु शकते भविष्यात वरीलप्रमाणे इतर कोणत्याही अधिकारी व कर्मचाऱ्याकडे अतिप्रदान निघाल्यास त्यांच्या बाबतीतही यानुसार निर्णय घेणे सोयीचे होईल. त्यामुळे सदरचा विषय वित्त समितीसमोर निर्णयार्थ सादर.(सहपत्र X)<br>**वि.स.ठराव** – मा. सहसंचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्या कार्यालयाकडून विद्यापीठातील एकूण 103 कर्मचाऱ्यांच्या बाबतीच दर्शविलेल्या त्रुटींचे निराकरण करणेसाठी प्रशासकीय अधिकारी सौ. अर्चना बोराडे यांनी विशेष लक्ष घालून मार्गदर्शन करावे असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयाकडून विद्यापीठातील एकूण 103 कर्मचाऱ्यांबाबत दर्शविलेल्या त्रुटींचे निराकरण करण्यासाठी सहसंचालक, उच्चशिक्षण पुणे, व प्रशासकीय अधिकारी यांनी विशेष लक्ष घालून मार्गदर्शन करावे यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.24<br>वि.स.ठराव 4.5.4 | एम.के.सी.एल. यांना त्यांचे देयकापोटी रु. 3.03 कोटी अदा करणेबाबत....<br>(टिपणी : एम.के.सी.एल. यांचेशी झालेल्या करारानुसार विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमांच्या प्रवेश व परीक्षा संदर्भातील डाटा प्रोसेसिंगपोटी देय असलेले रु. 3.03 कोटी रुपयांचे देयक अदा करणेस मान्यता मिळणेबाबत सादर.)<br>**वि.स.ठराव**- एम.के.सी.एल. यांना त्यांचे देयकापोटी रु. 3.03 कोटी अदा करणेस मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठ व एम.के.सी.एल. यांचेशी झालेल्या करारानुसार, विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमांच्या प्रवेश व परीक्षा संदर्भातील डाटा प्रोसेसिंगपोटी देय असलेले रु. 3.03 कोटी रुपयांचे देयक अदा करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.25<br>वि.स.ठराव 4.5.5 | मे 2015 च्या परीक्षेसाठी लागणाऱ्या मार्कशीट व पासिंग सर्टिफिकेटसाठी येणाऱ्या रु.18,79,500/- खर्चास मान्यता मिळणेबाबत...<br>(टिपणी : मे 2015 मध्ये झालेल्या परीक्षांचे द्यावयाचे एम.के.सी.एल. प्रणालीचे 7,50,000 मार्कशीट व 10,000 डॉस प्रणालीचे मार्कशीट तसेच 1,00,000 एम.के.सी.एल. प्रणालीचे सर्टिफिकेट छपाईसाठी रु.18,79,500/- खर्चास मान्यतेसाठी सादर..) (सहपत्र-Y)<br>**वि.स.ठराव**- मे 2015 च्या परीक्षेसाठी लागणाऱ्या मार्कशीट व पासिंग सर्टिफिकेटसाठी येणाऱ्या रु.18,79,500/- खर्चास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार मे 2015 मध्ये झालेल्या परीक्षांचे एम.के.सी.एल. प्रणालीचे 7,50,000 मार्कशीट व 10,000 डॉस प्रणालीचे मार्कशीट तसेच 1,00,000 एम.के.सी.एल. प्रणालीचे सर्टिफिकेट छपाईसाठी रु.18,79,500/- खर्चास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.26<br>बां.स.बैठक 400/2015/07 | **बांधकाम समिती (दि. 6/5/2015 व 24/8/2015) च्या बैठकीचे विषय मान्यतेस्तव सादर**<br>पुणे विभागीय केंद्राची इमारत बांधकाम निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव<br>(टिपण्णी : पुणे विभागीय केंद्रासाठी पुणे महानगरपालिकेकडून मिळालेल्या जागेवर विभागीय कार्यालय व कम्युनिटी कॉलेजसाठी इमारत बांधकामासाठी विद्यापीठाने नियुक्ती केलेले अर्कि.मनोज जाधव यांनी तयार केलेले अंदाजपत्रक व नकाशे दि. 06 मे. 2015 रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. त्यानुसार बांधकाम समितीने ठराव क्र. अ/400/2015/03.2 नुसार मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरहू अंदाजपत्रक व नकाशे पुणे महानगरपालीका व सार्वजनीक बांधकाम विभाग पुणे यांच्याकडे तांत्रिक मान्यतासाठी सादर करण्यात आले आहे. तांत्रिक मान्यतेची प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरहू कामाची निविदा प्रक्रिया सुरु करण्यास बांधकाम समिती च्या मान्यतेसाठी विषय सविनय सादर.) |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव क्र. अ/400/2015/07.1**<br>पुणे विभागीय केंद्र इमारत बांधकाम करण्याच्या अंदाजपत्रक व नकाशाला तांत्रिक मान्यता बाबत सा.बा.वि.पुणे येथे चौकशी केली असता त्याबाबत सा.बा.वि.यांनी सांगितले की सदरहू कामासाठी तांत्रिक मान्यता आज किंवा उद्या मिळेल असे सांगितले. समिती सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा केली त्यात सर्व समिती सदस्यांनी सदरहू प्रस्तावावर असे मत मांडले की जरी अंदाजपत्रक नकाशानुसार संपूर्ण कामासाठी तांत्रिक मिळाली असली तरी सुध्दा सदरहू नकाशाप्रमाणे विद्यापीठाला आवश्यकतानुसार तीन भागामध्ये इमारतीचे बांधकाम करण्याची तरतूद आहे त्यानुसार सुरुवातीस विद्यापीठाच्या विभागीय केंद्राच्या प्रशासकीय कार्यालयासाठी आवश्यक असणारे बांधकाम पहिल्या टप्यात करण्यात यावे व उर्वरीत बांधकाम आवश्यकतेनुसार करावे असे वाटते. यावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला.<br>पुणे विभागीय केंद्राच्या प्रशासकीय कार्यालयासाठी पहिल्या टप्याचे बांधकाम करण्यासाठी तांत्रिक मान्यता मिळालेल्या अंदाजपत्रकातील पहिल्या भागाच्या अंदाजपत्रकाची प्रारुप निविदा तयार करुन सार्वजनीक बांधकाम विभागाकडून मंजूर करुन निविदेबाबतची पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर करुन विद्यापीठामार्फत बांधकाम करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले व सदरहू ठराव पुढील व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.) (सहपत्र- L)<br>**व्य.मं.ठराव: सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.27<br>बां.स.बैठक<br>400/2015/08 | विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा समिती अहवाल व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समीतीच्या निर्णयास्तव सादर.<br>(टिप्पणी : बांधकाम समितीचा ठराव क्र. अ/400/2015/03.4 नुसार विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी पॅनल तयार करण्यासाठी निविदा तयार करुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 12 (बारा) पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 06 (सहा) पुरवठाधारकांनी निविदा भरली होती. 02 (दोन) निविदा मुदतीनंतर आल्या होत्या त्या निविदा समितीसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आल्या होत्या. समितीने याबाबत निविदेच्या अटी व शर्तीनुसार व जाहीरात नुसार दोन्ही निविदा नस्विकारण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे समितीने मुदतीपर्यत आलेल्या 06 (सहा) निविदेच्या तांत्रिक निविदा विद्यापीठाच्या तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीने निविदाधारकांसमोर उघडून तांत्रिक तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तांत्रिक तौलनीक तक्तानुसार सर्व निविदाधारकांची बैठक दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी घेण्यात आली. सदरहू बैठकीत ज्या निविदाधारकांच्या निविदासोबत अपूर्ण कागदपत्रे व त्रृटी होत्या त्या समितीने निविदाधारकांना सांगितल्या. ज्या निविदाधारकांनी कागदपत्राची पूर्तता करण्याची विनंती केली होती त्यांना दि. 08.08.2015 पर्यत दुपारी 01.00 वाजेपर्यत कागदपत्रे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार तांत्रिक तौलनीक तक्तानुसार निविदा उघडण्याच्या समितीने 03 निविदा अपात्र ठरवून उर्वरीत 03 (तीन) निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविल्या. समितीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. समितीच्या निर्णयानुसार पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या व्यापारी निविदा दि. 11 ऑगस्ट 2015 रोजी निविदाधारकांसमवेत उघडून दर तौलनीक तक्ता तयार करण्यात आला आहे. तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीचे इतिवृत्त व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.)<br>**ठराव क्र. अ/400/2015/08.1**<br>विद्यापीठाच्या आवारातील व विभागीय केंद्रावरील इमारतीचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या निविदा उघडण्याच्या समिती बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देवून समितीने असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर असलेले मे. जगदीश डी.पवार नाशिक ह्यांनी सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्या दरसुचीवर 0.1 टक्के कमी दराचे असल्याने त्याना सदरहू कामाचा आदेश निर्गमित करुन निविदेच्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात यावा तसेच त्याच दरात उर्वरीत ठेकेदार जर हे काम करण्यास तयार असल्यास त्यांना ह्या कामाच्या पॅनलमध्ये समाविष्ठ करुन नियुक्ती आदेश देवून निविदेच्या अटी व शर्तीनुसार करार करण्यात यावा व आवश्यकतेनुसार कामाचे वाटपाचे नियोजन करावे असे सर्वानुमते ठरले. सदरहू निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | यावा.<br>**व्य.मं.ठराव: सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |

150.4.28
बां.स.बैठक
400/2015/08.3

विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा समिती अहवाल व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समीतीच्या निर्णयास्तव सादर.

(टिप्पणी : बांधकाम समितीचा ठराव क्र. अ/400/2015/03.6 नुसार विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षीक देखभाल वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी पॅनल तयार करण्यासाठी निविदा तयार करुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 12 (बारा) पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 06 (सहा) पुरवठाधारकांनी निविदा भरली होती. त्यामुळे समितीने मुदतीपर्यत आलेल्या 06 (सहा) निविदेच्या तांत्रिक निविदा विद्यापीठाच्या तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीने निविदाधारकांसमोर उघडून तांत्रिक तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तांत्रिक तौलनीक तक्तानुसार सर्व निविदाधारकांची बैठक दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी घेण्यात आली. सदरहू बैठकीत ज्या निविदाधारकांच्या निविदासोबत अपूर्ण कागदपत्रे व त्रृटी होत्या त्या समितीने निविदाधारकांना सांगितल्या. ज्या निविदाधारकांनी कागदपत्राची पूर्तता करण्याची विनंती केली होती त्यांना दि. 08.08.2015 पर्यत दुपारी 01.00 वाजेपर्यत कागदपत्रे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार तांत्रिक तौलनीक तक्तानुसार निविदा उघडण्याच्या समितीने सर्व 06 (सहा) निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविल्या. समितीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. समितीच्या निर्णयानुसार पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या व्यापारी निविदा दि. 11 ऑगस्ट 2015 रोजी निविदाधारकांसमवेत उघडून दर तौलनीक तक्ता तयार करण्यात आला आहे. तांत्रिक निविदा उघडण्याच्या समितीचे इतिवृत्त व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.)

__ठराव क्र. अ/400/2015/08.3__

विद्यापीठाच्या आवारातील व विभागीय केंद्रावरील विद्युत उपकरणे व मशनरी यांचे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठीच्या कामासाठी कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन दि. 07 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या निविदा उघडण्याच्या समिती बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देवून समितीने असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार (1) वातानुकुलीत यंत्रनेसाठी मे.जे.के.रिफ्रेजरेशन, नाशिक व मे.गणेश रिफ्रेजरेशन, नाशिक या दोन्ही ठेकेदारांचे वेगवेगळया कंपनीचे AC साठी दर आलेले आहेत त्यात दोघामध्ये खालीलप्रमाणे सर्वात कमी दर निश्चित करण्यात आले त्या दरात दोन्ही ठेकेदार काम करण्यास तयार असतील तर त्यांना दोघांना आवश्यकतेनुसार काम करण्याचे आदेश देवून निविदेनुसार करार करण्यात यावा.

| अ.क्र. | एसी मेक | प्रती ए सी साठी एकवेळचा देखभालीचा दर |
|---|---|---|
| 01 | Cassette Type LG 3 T | 420/- |
| 02. | Cassette Type Carrier 5 T | 780/- |
| 03. | Cassette Type Dycine 2 T | 330/- |
| 04. | Split Type LG 2 T | 210/- |
| 05. | Split Type Loyad 2 T | 330/- |
| 06. | Split Type Hire 1.5 T | 330/- |
| 07. | Split Type Voltas 2 T | 231/- |
| 08. | Split Type Dycine 1.5 T | 170/- |
| 09. | Split Type Blue star 19 T | 850/- |
| 10. | Split Type Samsung 1.5 T | 208/- |
| 11. | Split Type Kenstar 2 T | 234/- |
| 12. | Split type Cruse 1.5 T | 330/- |
| 13. | Split Type Carrier 4.5 T | 420/- |
| 14. | Window Type Onida 1.5 T | 233/- |

(2) वॉटर कुलर साठी तौलनीक दरानुसार सर्वात कमी दर असलेले ठेकेदार मे. गणेश रिफ्रेजरेश,

| | | |
|---|---|---|
| | | नाशिक यांना प्रती वॉटर कुलर एक वेळेसाठी रु. 183/- या दराने कामाचा आदेश देवून करार करण्यात यावा. तसेच मे. [illegible], नाशिक हे निविदाधारक सुध्दा रु. 183/- या दराने काम करण्यास तयार असल्यास त्यांची पॅनलमध्ये समाविष्ठ करण्यात यावे. (3) एअर कुलर साठी मे. [illegible] दर भरले आहेत सदरहू दर योग्य असल्यामुळे त्यांना प्रती वॉटर कुलरसाठी एक वेळेस रु. 240/- या दराने कामाचा आदेश देवून करार करण्यात यावा. (4) सोलर वॉटर सिस्टीमसाठी तौलनीक तक्त्यात नमुद केलेले दर समितीला बाजार भावापेक्षा जास्त वाटत असल्यामुळे समितीने असा निर्णय घेतला की जर संबंधीत ठेकेदार हे इतर उपकरणेप्रमाणे प्रति पॅनल सर्व्हिसिंग फी व प्रती पहाणी फी या प्रमाणे काम दिल्यास कमी खर्च येईल, यासाठी बांधकाम समितीचे सचिव यांनी संबंधीत ठेकेदार याबाबत विचारणा केली असता त्यातील (1) मे. युनिक सोलर सिस्टीम नाशिक व (2) मे. श्री एंटरप्राईजेस, नाशिक यांनी सोलर वॉटर सिस्टीमसाठी प्रती पॅनल सर्व्हिसिंगसाठी रु. 200/- व प्रति पहाणी फी रु. 700/- या दराने दिली त्यास समिती मान्यता देवून दोन्ही वरील दोन्ही ठेकेदारांचे पॅलन तयार करुन नियुक्तीपत्र देण्यात यावे व निविदेच्या अटी व शर्तीनुसार दर करार करण्यात यावा. (5) लिप्ट कोने मेक, वॉटर प्युरीफायर व वॉटर बॉईलर च्या वार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी एकही निविदा प्राप्त झालेली नाही करिता सदरहू काम हे स्थानिक ठेकेदार अथवा सस्था यांच्याकडून आवश्यकतेनुसार विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावे किंवा वरील उपकरणासाठी भरलेल्या निविदाधारकांपैक जो निविदा धारक हे काम करण्यास तयार असल्यास त्यांच्याकडून सदरहू काम करुन घ्यावे असे सर्वानुमते ठरले. सदरहू निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.<br>**व्य.मं.ठराव : सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.29<br>बां.स.बैठक<br>400/2015/08.4 | विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विविध बांधकामासाठी तज्ञांचे पॅनल तयार करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा तौलनीक तक्ता व व्यापारी निविदा दर तौलनीक तक्ता बांधकाम समितीच्या निर्णयास्तव सादर.<br>(टिप्पणी : बांधकाम समितीचा ठराव क्र. अ/400/2015/03.7 नुसार विद्यापीठ आवारातील व विभागीय केंद्रावरील विविध बांधकामासाठी वास्तूतज्ञांचे पॅनल तयार करण्यासाठी निविदा तयार करुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात (1) Civil Consultants साठी मुदतीपर्यत एकूण 11 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 11 निविदाधारकांनी निविदा भरली होती. (2) Electrical Consultants साठी मुदतीपर्यत एकूण 02 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 02 निविदाधारकांनी निविदा भरली होती. (3) Interior साठी मुदतीपर्यत एकूण 21 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 12 निविदाधारकांनी निविदा भरली होती. (4) Architecure साठी मुदतीपर्यत एकूण 20 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपयत 12 निविदाधारकांनी निविदा भरली होती. (5) Stuctureal Consultants साठी मुदतीपर्यत एकूण 10 तज्ञांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 08 निविदाधारकांनी निविदा भरली होती. मुदतीनंतर (1) Civil Consultants तज्ञांनासाठी 01 (2) Interior तज्ञांनासाठी 02 (3) Architecure 1 तज्ञांनासाठी 01 अशा एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या होत्या. निविदा मुदतीनंतर आल्या होत्या त्या निविदा समितीसमोर निर्णयास्तव ठेवण्यात आल्या होत्या. समितीने याबाबत निविदेच्या अटी व शर्तीनुसार व जाहीरात नुसार चारही निविदा नस्विकारण्याचा निर्णय घेतला. मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा त्याच दिवशी दुपारी 02.30 निविदाधारकांसमोर उघडून तांत्रिक तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तांत्रिक तौलनीक तक्तानुसार (1) Civil Consultants साठी 11 निविदाधारकांपैकी 02 निविदा अपात्र व 09 निविदा पात्र ठरल्या. (2) Electrical Consultants साठी दोन्ही निविदा पात्र ठरल्या. (3) Interior साठी 12 निविदाधारकांपैकी 07 निविदा अपात्र व 05 निविदा पात्र ठरल्या. (4) Architecure साठी 12 निविदाधारकांपैकी 05 निविदा अपात्र व 07 निविदा पात्र ठरल्या. (5) Stuctureal Consultants साठी 08 निविदाधारकांपैकी 03 निविदा अपात्र व 05 निविदा पात्र ठरल्या. पात्र ठरलेल्या निविदा धारकांच्या व्यापारी निविदा दि. 20.08.2015 रोजी उघडण्यात येणार आहेत. त्यामुळे सदरहू व्यापारी निविदेंचा दर तौलनीक तक्ता व तांत्रिक तौलनीक तक्ता दि. 24.08.2015 रोजी समितीला सादर करण्यात येतील. त्यावर निर्णय घेण्याबाबतचा विषय बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.)<br>**<u>ठराव क्र. अ/400/2015/08.4</u>**<br>विद्यापीठाच्या आवारातील व विभागीय केंद्रावरील विविध बांधकामासाठी तज्ञांचे पॅनल तयार करण्याच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक |

| | | |
|---|---|---|
| | | तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. चर्चेत समिती सदस्यांनी या तज्ञ पॅनल कडून विद्यापीठ कोणकोणती कामे करुन घेणार आहेत यावर कार्यकारी अभियंता यांनी खालीलप्रमाणे तज्ञ पॅनल कडून खालीलप्रमाणे कामे करून घेणार आहोत.<br>01) कामाचे नकाशे तयार करणे.<br>02) कामाचे अंदाजपत्रक तयार करणे व योग्य त्या स्तरावर त्यास मंजूरी घेणे.<br>03) कामाची निविदा तयार करणे.<br>04) कामाच्या निविदेची तपासणी करणे.<br>05) कामाची देखभाल करणे.<br>06) कामाची तपासणी करणे.<br>यावर समिती सदस्यांनी असा निर्णय घेतला की तौलंनीक तक्तानुसार (1) Civil Consultants साठी सर्वात कमी दर मे माहिमतुरा कनस्ल्टन्ट, मुंबई याचा अनुक्रमे 0.75 टक्का व 2.00 टक्का आहे. (2) Electrical Consultants साठी सर्वात कमी दर मे संतोष नामदेव शेखर, याचा अनुक्रमे 2.5 टक्का (3) Interior साठी साठी सर्वात कमी दर मे साई प्रोजेक्ट कंसल्टंट याचा अनुक्रमे 2.00 टक्का आहे. (4) Architecure साठी साठी सर्वात कमी दर मे माहिमतुरा कनस्ल्टन्ट, मुंबई याचा अनुक्रमे 2.00 टक्का व 2.00 टक्का आहे. (5) Stuctureal Consultants साठी सर्वात कमी दर मे माहिमतुरा कनस्ल्टन्ट, मुंबई याचा अनुक्रमे 1.00 टक्का आहे. वरीलप्रमाणे सर्वात कमी दर असलेल्या तज्ञांना नियुक्ती पत्र देवून निविदेच्या अटी व शर्तीनुसार दरकरार करण्यात यावा तसेच सर्वात कमी आलेल्या दरात जर इतर तज्ञ काम करण्यास तयार असतील तर त्यांनाही पॅनलमध्ये समाविष्ठ करुन नियुक्ती पत्र देण्यात यावे व निविदेच्या अटी व शर्तीनुसार दर करार करण्यात यावा व त्यांनाही आवश्यकतेनुसार कामाचे वाटप करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. सदरहू निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.<br>**व्य.मं.ठराव: सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| | 150.4.30<br>वि.स.बैठक<br>5.3.1 | **वित्त समिती बैठक** (6/10/2015)<br>बी.एड. शिक्षणक्रम NCTE 2014 Norms नुसार केलेल्या दोन मुदतठेवींना कार्योत्तर मंजूरी देणे बाबत....<br>(टिप्पणी : बी.एड. शिक्षणक्रम NCTE 2014 च्या Norms नुसार पुढीलप्रमाणे दोन मुदतठेवी मध्ये गुंतवणूक करणे आवश्यक होते.<br>1. Endowment Fund 15,00,000/-<br>2. Reserve Fund रु.21,00,000/-<br>अशा एकूण रु.36,00,000/- च्या केलेल्या दोन मुदतठेवींना कार्योत्तर मंजूरी (सोबत सहपत्र B)<br>**वि.स.ठराव** - बी.एड. शिक्षणक्रम NCTE 2014 Norms नुसार रु.36,00,000/- च्या मुदत ठेवींना मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व त्यास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव : वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार NCTE 2014 च्या Norms नुसार बी.एड. शिक्षणक्रमासाठी (1) Endowment Fund 15,00,000/ (2) Reserve Fund रु. 21,00,000/- याप्रमाणे मुदत ठेवीं करण्यासाठी मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.31<br>वि.स.बैठक<br>5.3.2 | विद्यापीठ कर्मचाऱ्यांना आरोग्य विषयक सेवा पुरविणेबाबत.....<br>(टिपणी : विद्यापीठ कर्मचाऱ्यांना कल्याणकारी योजनेअंतर्गत आरोग्य विषयक सेवा पुरवण्याबाबत वित्त समितीच्या दिनांक 23 मार्च 2015 रोजी झालेल्या सभेत सुचविण्यात आले होते. तसेच या पूर्वी कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी विविध रुग्णालयांची देयके शासन नियमानुसार तपासून त्याची प्रतिपूर्ती करण्यात येत होती. या प्रक्रियेत विलंब होत होता, कर्मचाऱ्यांना सेवा मिळणे किंवा प्रतिपूर्ती मिळणे अवघड होत होते. तसेच खर्चही वाढलेला होता. त्यामुळे नाशिक शहरातील विश्वस्त संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांचा अभ्यास करून नाशिक शहरातील श्री.गुरुजी रुग्णालय यांचेशी याबाबत संपर्क साधण्यात आला. श्री गुरुजी रुग्णालय हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान या विश्वस्त संस्थेद्वारे संचलित येत असल्यामुळे तेथील सेवा सुविधा चांगल्या मिळतात व |

| | | |
|---|---|---|
| | | कमी खर्चातही मिळतात. तसेच सदर रुग्णालय हे विद्यापीठाच्या रस्त्यावरीलच असल्यामुळे सदर रुग्णालयाशी विद्यापीठ कर्मचारी व कुटुंबियांना आरोग्य विषयक सेवा देणेबाबत प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यांचेशी सखोल चर्चा करण्यात आली व त्यानंतर करारनामा करण्यात आलेला आहे, त्यास कार्योत्तर मंजूरीस्तव सादर.) (सोबत करारनामा - सहपत्र पृष्ठ क्र. C)<br>**वि.स.ठराव -** विद्यापीठ कर्मचाऱ्यांना आरोग्य विषयक सेवा पुरविण्यासाठी श्री.गुरुजी रुग्णालयाशी केलेल्या करारनाम्यास मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व त्यास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांना आरोग्य विषयक सेवा पुरविण्यासाठी श्री. गुरुजी रुग्णालयाशी करार केलेला आहे. मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.32<br>वि.स.बैठक<br>5.3.3 | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या कमवा व शिका योजनेअंतर्गत दि. 10 ऑगस्ट ते 9 सप्टेंबर 2015 कालावधीत आयोजिलेल्या परीक्षांसाठी रु.23,07,200/- खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत...<br>(टिपणी : विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या कमवा व शिका योजनेअंतर्गत डिप्लोमा शिक्षणक्रमाच्या दिनांक 10 ते 26 ऑगस्ट 2015 दरम्यान लेखी तर 27 ऑगस्ट ते 9 सप्टेंबर 2015 या कालावधीत प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या. या परीक्षांसाठी रु.23,07,200/- खर्चास मा.कुलगुरू यांची मान्यता घेण्यात आलेली असून सदर विषय कार्योत्तर मान्यतेस्तव सादर. (सोबत सहपत्र D)<br>**वि.स.ठराव -** विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या कमवा व शिका योजनेअंतर्गत दि. 10 ऑगस्ट ते 9 सप्टेंबर 2015 कालावधीत आयोजिलेल्या परीक्षांसाठी रु.23,07,200/- खर्चास मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेच्या कमवा व शिका योजनेअंतर्गत दि. 10 ऑगस्ट ते 9 सप्टेंबर 2015 कालावधीत आयोजित केलेल्या परीक्षांसाठी येणाऱ्या रु. 23,07,200/- खर्चास मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.33<br>वि.स.बैठक<br>5.3.4 | नोव्हेंबर 2015 पासून पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रति विद्यार्थी रु.500/- आकारणे बाबत...<br>(टिपणी : दिनांक 13 जुलै 2015 रोजी संचालकांच्या बैठकीत नोव्हेंबर 2015 पासून पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरून घेण्याबाबत व शुल्काबाबत सखोल चर्चा झाली. यावर एकमत होऊन नोव्हेंबर 2015 पासून परीक्षा अर्ज MKCL Software वर ऑनलाईन करण्यात येईल व त्याचे शुल्क सर्व शिक्षणक्रमांसाठी सारखे ठेवण्यात यावे असे ठरले. त्यानुसार नोव्हेंबर 2015 पासून पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रति विद्यार्थी रु.500/- आकारणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.<br>(सोबत सहपत्र D-1)<br>**वि.स.ठराव -** नोव्हेंबर 2015 पासून पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रति विद्यार्थी रु.500/- आकारण्यास मा.कुलगुरूंनी दिलेल्या मंजूरीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली व यास कार्योत्तर मंजूरीबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार नोव्हेंबर 2015 पासून सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासक्रमासाठी पुर्नपरीक्षार्थी परीक्षा शुल्क म्हणून विद्यार्थ्यांकडून रु. 500/- आकारण्यास मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे याबाबत केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | | **सखोल चर्चा करावयाचे विषय** |
| | 150.4.34<br>वि.स.बैठक<br>5.4.1 | सहकार व्यवस्थापन पदविका (P-08) शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना रु.2,000/- शुल्क आकारून अन्य सहकार पदविका शिक्षणक्रमांना क्रेडिट ट्रान्सफर द्वारे नोंदणी करण्यास मान्यता देणेबाबत...<br>(टिपणी : शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून विद्यापीठाच्या शैक्षणिक शुल्क समितीच्या धोरणानुसार सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम शुल्कातही बदल करण्यात आलेले आहेत. या शुल्कात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असल्याने विद्यार्थ्यांना शुल्क परवडणारे नसल्याने विद्यार्थी संख्येवर त्याचा परिणाम झाल्याचा अभ्यास केंद्रांनी कळविले आहे. त्यामुळे सहकार व्यवस्थापन पदविका (P-08) हा शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना क्रेडिट ट्रान्सफर द्वारे सहकार व्यवस्थापन पदविकेतील - दुग्धव्यवसाय (P-51), बँकिंग (P-52), कृषिपुरक सहकारी संस्था (P-59), स्वयंरोजगार सेवा सहकारी |

| | | |
|---|---|---|
| | | संस्था (P-75) यापैकी एक किंवा दोन शिक्षणक्रमास रु.2000/- शुल्क आकारून शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून नोंदणी करण्यास मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव सादर.)(सोबत सहपत्र E)<br>**वि.स.ठराव** - सहकार व्यवस्थापन पदविका (P-08) शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना रु.2,000/- शुल्क आकारून अन्य सहकार पदविका शिक्षणक्रमांना क्रेडिट ट्रान्सफर द्वारे नोंदणी करण्यास मान्यता देण्यात यावी व त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले. शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून याबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याने ह्या विषयास कार्योत्तर मंजुरी द्यावी असेही पुढे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार सहकार व्यवस्थापन पदविका (P-08) शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना रु. 2,000/- शुल्क आकारून, अन्य सहकार पदविका शिक्षणक्रमांना क्रेडिट ट्रान्सफर द्वारे नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आली. शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून कार्यवाही करण्यात येत असल्याने या विषयास कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे याची नोंद घेण्यात आली.** |
| | 150.4.35<br>वि.स.बैठक<br>5.4.2 | शैक्षणिक वर्ष 2015-16 च्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेशाच्या मुदतवाढीबाबत....<br>(टिपणी : शैक्षणिक वर्ष 2015-16 साठी विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांचे प्रवेश दिनांक 1 जून 2015 पासून ऑनलाईन पद्धतीने सुरु झालेले आहेत. ऑगस्ट 2015 अखेरही विद्यार्थी प्रवेशाबाबत मागणी करीत असल्याचे अनेक अभ्यास केंद्रांनी कळविल्याने ही मुदत 31 ऑगस्ट 2015 पर्यंत वाढविण्यात आली होती. मात्र अजूनही विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असल्याने विनाविलंब शुल्कासह ही मुदत दिनांक 15 सप्टेंबर 2015 पर्यंत तर विलंब शुल्काहस दि. 30 सप्टेंबर 2015 पर्यंत वाढविण्यास मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव सादर.)<br>**वि.स.ठराव** - शैक्षणिक वर्ष 2015-16 च्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेशाच्या मुदतवाढीस मान्यता देण्यात आली त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार शैक्षणिक वर्ष 2015-16 च्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेशाच्या मुदतवाढीस मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.36<br>वि.स.बैठक<br>5.4.3 | विभागीय क्रिडा व युवकमहोत्सव खर्चाचे दर निश्चित करणेबाबत....<br>(टिपणी : आंतरविद्यापीठीय स्तरावरील युवक महोत्सवाच्या सांस्कृतिक स्पर्धांच्या (इंद्रधनुष्य) तसेच क्रिडा स्पर्धांच्या (अश्वमेध) अगोदर विद्यापीठाच्या विविध विभागीय केंद्रांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात येतात. यासाठीच्या खर्चाच्या विविध शिर्षकांचे दर निश्चित करण्यासाठी महाराष्ट्रातील तीन विद्यापीठांच्या दरांचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार सदर स्पर्धासाठीचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत. यानुसार अश्वमेध स्पर्धासाठी प्रत्येक विभागीय केंद्रासाठी रु.2,60,150/- प्रमाणे एकूण 8 विभागीय केंद्रासाठी रु.20,81,200/- एवढा खर्च तर इंद्रधनुष्य स्पर्धासाठी रु. 2,65,000/- प्रति विभागीय केंद्र प्रमाणे रु.21,24,000/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर दरांना व त्यानुसार येणाऱ्या खर्च रु. 42,05,200/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.) (सोबत सहपत्र F)<br>**वि.स.ठराव** - विभागीय क्रिडा व युवकमहोत्सवांसाठी खर्चाच्या दरांना मान्यता देण्यात आली व त्यानुसार येणाऱ्या रु.42,05,200/- खर्चास मान्यता देण्यात आली व त्यास व्यवस्थापन मंडळास मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठाच्या विविध विभागीय क्रिडा व युवकमहोत्सवांसाठी तयार करण्यात आलेल्या दरांना व त्यानुसार येणाऱ्या रु. 42,05,200/- खर्चास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.37<br>वि.स.बैठक<br>5.4.4 | शिक्षण महर्षी बापुजी साळुंखे यांच्या नावाने ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (एम.लिब.) शिक्षणक्रमाच्या अंतिम परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक ठेवणेबाबत..<br>(टिपणी : श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (एम.लिब.) शिक्षणक्रमाच्या अंतिम परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु.1,000/- चे पारितोषिक देण्यासाठी रु.1,50,000/- अनमात रक्कम ठेवण्याचे मान्य केलेले आहे. सदर विषय मंजूरीस्तव सादर. (सोबत सहपत्र G)<br>**वि.स.ठराव** - शिक्षण महर्षी बापुजी साळुंखे यांच्या नावाने ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (एम.लिब.) शिक्षणक्रमाच्या अंतिम परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक ठेवण्यास व त्यासाठी अनामत रक्कम स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली व त्यास व्यवस्थापन मंडळास मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार शिक्षण महर्षी बापुजी साळुंखे यांच्या नावाने ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (एम.लिब.) शिक्षणक्रमाच्या अंतिम परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. 1000/- पारितोषिक ठेवण्यास व त्यासाठी अनामत रक्कम म्हणून रु.1,50,000/- स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.38<br>वि.स.बैठक<br>5.4.5 | विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत...<br>(टिपणी : विद्यापीठातील कायम सेवेतील नियमित वेतनश्रेणीतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना व इतर कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट/सानुग्रह अनुदान दरवर्षी देण्यात येते. दिनांक 14.10.2014 रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्र. 1.5.3 नुसार सन 2013-14 साठी खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते.<br>1. नियमित कर्मचारी : रु. 22,000/-<br>2. करारावरील कर्मचारी : रु. 16,500/-<br>3. पी.आर.ओ., लेखापाल, डाटा एन्ट्री ऑप. : रु. 11,000/-<br>4. सफाई, सुरक्षा व इतर : रु. 1,700/-<br>सन 2014-15 साठी सानुग्रह अनुदान देणेबाबत विषय चर्चेस्तव सादर.) (सोबत सहपत्र H)<br>**वि.स.ठराव** - विद्यापीठ कर्मचाऱ्यांना मागील वर्षाच्या नियमाप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देण्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले. तसेच सर्वच कर्मचाऱ्यांचे आरोग्य सदृढ रहाण्याच्यादृष्टीने नव्यानेच करार करण्यात आलेल्या श्री.गुरुजी रुग्णालयात आरोग्य तपासणीसाठी व त्यासाठी येणाऱ्या एकत्रित खर्चास मान्यता देण्यास व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असेही पुढे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठ कर्मचाऱ्यांना मागील वर्षीप्रमाणे केलेल्या नियमानुसार सानुग्रह अनुदान (Salary & Allowances या लेखाशिर्षातून) देण्यास मान्यता देण्यात आली तसेच विद्यापीठातील सर्व नियमित शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांचे आरोग्य सुदृढ रहाण्याच्या दृष्टीने नव्यानेच करार करण्यात आलेल्या श्री.गुरुजी रुग्णालयात आरोग्य तपासणीसाठी प्रत्येकी वर्षातून एकदाच रू. 1400/- खर्चास व त्यासाठी येणाऱ्या एकत्रित खर्चास (Employee Welfare Fund या लेखाशिर्षातून) मान्यता देण्यास आली.** |
| | 150.4.39<br>वि.स.बैठक<br>5.4.6 | नोव्हेंबर 2015 व मे 2016 परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपुस्तिका छपाईसाठी येणाऱ्या खर्च रु.180 लक्ष व त्यासाठी Confidential (Invitation) Tender काढणेबाबत मान्यता मिळणेबाबत....<br>(टिपणी : नोव्हेंबर 2015 तसेच मे 2016 मध्ये होणाऱ्या विविध शिक्षणक्रमांच्या परीक्षांसाठी 20 पानी उत्तरपुस्तिकांची आवश्यकता लागणार आहे. मागील वर्षीचा साठा अत्यल्प असल्याने पुढील परीक्षांची विद्यार्थी संख्या लक्षात घेता नोव्हेंबर पुरवणी परीक्षेसाठी 5 लाख व मे 2016 मुख्य परीक्षेसाठी 45 लाख उत्तरपुस्तिका छपाई करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजे रु.180 लक्ष खर्च येणार आहे. सदर गोपनीय कामासाठी Invitation Tender Form नुसार टेंडर करण्यास व गोपनीय प्रिंटरच्या यादीस व खर्चास मंजूरीस्तव सादर.(सोबत सहपत्र I)<br>**वि.स.ठराव** - नोव्हेंबर 2015 व मे 2016 परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपुस्तिका छपाईसाठी येणाऱ्या खर्च रु. 180 लक्ष व त्यासाठी Confidential (Invitation) Tender काढण्यास मान्यता देणेबाबत व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार नोव्हेंबर 2015 व मे 2016 परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपुस्तिका छपाईसाठी येणाऱ्या रु. 180 लक्ष खर्चासाठी Confidential (Invitation) Tender काढण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.40<br>वि.स.बैठक<br>5.4.7 | 52.4.1 (शिक्षणशास्त्र विद्याशाखा)<br>नव्याने जारी केलेल्या Rehabilitation Council of India, New Delhi च्या गाईडलाईन नुसार दूरशिक्षणातील विशेष बी.एड शिक्षणक्रमाची नवीन संरचना व कार्यप्रणाली मान्यतेसाठी सादर.<br>(टिपणी - Rehabilitation Council of India यांनी मे 2015 मध्ये विशेष बी.एड शिक्षणक्रमाची अभ्यासक्रम चौकट नव्याने प्रसिध्द केली आहे. त्या अनुषंगाने दूरशिक्षणातील विशेष बी.एड शिक्षणक्रमातही काही बदल Rehabilitation Council of India ने केलेले दिसतात. विद्यापीठाने विकसित केलेल्या विशेष बी.एड शिक्षणक्रमात त्या मार्गदर्शक तत्वानुसार बदल करुन नवीन संरचना तयार करण्यात आलेली आहे. सदर संरचना व कार्यप्रणाली विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर) |

(सहपत्र D)

**वि.प.ठराव:** नव्याने जारी केलेल्या Rehabilitation Council of India, New Delhi च्या गाईडलाईन नुसार दूरशिक्षणातील विशेष बी.एड शिक्षणक्रमाची नवीन संरचना, कार्यप्रणाली, प्रस्तावित शुल्क रचना, विकसन पध्दत, मूल्यमापन पध्दत, गुणवितरण, उत्तीर्णतेचचे नियम, विकसन खर्च इत्यादी यांस मंजूरी देण्यात आली. सदरील विषयातील आर्थिक बाबींना मंजूरी देण्याबाबत वित्त समितीमध्ये विषय ठेवण्यात यावा.

52.4.4 **(शैक्षणिक सेवा विभाग)**

बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष तसेच द्वितीय व तृतीय वर्ष श्रेयांकातर सुधारित शुल्क रचनेस मान्यता मिळणेबाबत. (सहपत्र G)

**वि.प.ठराव:** सदर विषयास मंजूरी देण्यात आली. परंतु या विषयात बी.ए ग्राहक सेवा या शिक्षणक्रमात सुधारित शुल्क रचना करावयाची असल्याने सदरील विषय वित्त समितीमध्ये ठेवण्यात यावा. वित्तसमितीच्या विचारार्थ सादर.

52.4.8 विद्यापीठ परिसरात बांधण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण स्मृतीदालनाबाबत कोणकोणत्या गोष्टी ठेवाव्यात यासंदर्भात प्राध्यापक सुनीलकुमार लवटे यांनी सादर केलेल्या टिपणीबाबत. (सहपत्र J)

**वि.प.ठराव:**विद्यापीठ परिसरात बांधण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण स्मृती दालनाबाबत कोणकोणत्या गोष्टी ठेवाव्यात यासंदर्भात प्राध्यापक सुनीलकुमार लवटे यांनी सादर केलेल्या टिपणीबाबत सखोल चर्चा करण्यात आली. व टिपणीत नमूद केलेल्या 1 ते 5 मुद्यांबाबत योग्य तो निर्णय घेण्यासाठी मा.कुलगुरु यांना अधिकार प्रदान करण्यात आले. तसेच निर्मिती खर्चाबाबत वित्तसमितीमध्ये विषय ठेवण्यात यावा. वित्तसमितीच्या विचारार्थ सादर.

52.4.13 **(मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा)**

विद्यापीठात सुरु असलेल्या विविध अध्यासनामार्फत कोणकोणती कामे करावीत यासंदर्भात डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी सादर केलेल्या टिपणीबाबत..

(टिपणी - दिनांक 17 ऑगस्ट 2015 रोजी विद्यापीठातील संचालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती व या बैठकीत विद्यापीठात सुरु असलेल्या विविध अध्यासनामार्फत कोणकोणती कामे करावीत. याबाबत डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी सादर केलेली टिपणी व या टिपणीमध्ये मुद्दा क्र. 4 मध्ये देणगीची रक्कम रुपये 3 कोटी ऐवजी व रुपये 5 कोटी करण्यात यावी व विद्यापीठामार्फत कोणकोणती अध्यासने सुरु करावीत याचा अधिकार विद्यापीठाकडे राहील अशी सूचना टाकून सादर केलेली टिपणी मान्यतेसाठी सादर) (सहपत्र N)

**वि.प.ठराव:** विद्यापीठात सुरु असलेल्या विविध अध्यासनामार्फत कोणकोणती कामे करावीत यासंदर्भात डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी सादर केलेल्या टिपणीबाबत व सदरील विषयातील टिपणीमध्ये उल्लेख केलेल्या सूचना यांस मंजूरी देण्यात आली सदरील विषय वित्त समितीमध्ये ठेवण्यात यावा. वित्तसमितीच्या विचारार्थ सादर.

52.4.18 (निरंतर शिक्षण विद्याशाखा)

IIT / JEE साठी व्हीएलसी मार्फत प्रशिक्षण पुरविणेबाबत. (सहपत्र T)

(टिपणी — विद्यापीठाच्या इस्त्रोच्या उपग्रहामार्फत शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी एक हब बसवण्यात आला असून सदरचा हब मुक्त विद्यापीठाच्या सुमारे 55 अभ्यासकेंद्रांना जोडण्यात आला आहे. तसेच इस्त्रोच्या उपग्रहाची सुविधा या हबमार्फत यशदाच्या सुमारे 139 केंद्रामध्ये दिसू शकते. या अभ्यासकेंद्रावरील तसेच यशदाच्या केंद्रावरील साहित्याची तसेच विद्यापीठांतर्गत हब आणि शिक्षक यंत्रणाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी विद्यापीठाने इस्त्रोच्या मदतीने इन्फिनिअम या संस्थेशी वार्षिक सर्वसमावेशक देखरेख करार केला आहे. तथापि, विद्यापीठामार्फत कोणत्याही शिक्षणक्रमाचे प्रशिक्षण या यंत्रणेमार्फत केले जात नाही. त्यामुळे सदरच्या यंत्रणेचा योग्य वापर होत नाही. महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी अभियांत्रिकेचे सर्वोत्कृष्ट शिक्षण आयआयटी मार्फत मिळविण्याच्या प्रयत्नात असतात. याची प्रवेश परीक्षा ही अत्यत अवघड प्रकारची असते. त्यामुळे सदरच्या प्रवेश परीक्षेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी अनेक कोचिंग क्लासेस चालतात. तथापि, या क्लासेसचे शुल्क सुमारे एक लाख रुपये किंवा त्याहून अधिक असतात. हे शुल्क विद्यार्थ्यांना परवडणारे नसतात. त्यामुळे गरीब व दुर्बल

घटकातील विद्यार्थी सदर परीक्षेत यश मिळविण्यास असमर्थ ठरतात. त्यामुळे महाराष्ट्रातील गरीब व दुर्बल घटकांना माफक शुल्कात सदरच्या प्रवेश परीक्षेचे मार्गदर्शन लाभल्यास विद्यापीठाच्या ध्येय धोरणाशी सुसंगत आणि व्हीएलसी यंत्रणाच्या योग्य वापर संदर्भात कृती होईल. यासाठी सदर प्रस्ताव विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर)

**वि.प.ठराव:** IIT / JEE साठी व्हीएलसी मार्फत प्रशिक्षण पुरविणेबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सदरील विषय वित्त समितीमध्ये ठेवण्यात यावा. वित्तसमितीच्या विचारार्थ सादर.

52.4.19 **(परीक्षा विभाग)**

विविध परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे ऑनलाईन डिजीटल मूल्यमापनाबाबत

**वि.प.ठराव:** विविध परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे ऑनलाईन डिजीटल मूल्यमापनाचा प्रोजेक्ट नवीन असल्यामुळे ज्या ज्या शिक्षणसंस्थांचे संगणक, ब्रॉडबॅन्ड, मनुष्यबळ व साधने याचा वापर होणार आहे. त्यांना मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर रुपये 4/- प्रती उत्तरपुस्तिका भाडे देण्यास मंजूरी देण्यात आली. सदरील विषय वित्त समितीमध्ये ठेवण्यात यावा. वित्तसमितीच्या विचारार्थ सादर.

52.4.21 **(परीक्षा विभाग) वि.स.बैठक 26/6/2015, 4.4.6**

विद्यापीठाने दिलेल्या मार्कशीट, प्रमाणपत्र इत्यादीमध्ये बदल करावयास तसेच डुप्लिकेट मार्कशीट, प्रमाणपत्र, मायग्रेशन, व्हिरिफिकेशन इत्यादीसाठी प्रत्येकी रुपये 300/- शुल्क आकारणे.

**वि.स.ठराव-** विद्यापीठाने दिलेल्या मार्कशीट, प्रमाणपत्र इत्यादीमध्ये बदल करावयास तसेच डुप्लिकेट मार्कशीट, प्रमाणपत्र, मायग्रेशन, व्हिरिफिकेशन इत्यादीसाठी प्रत्येकी रुपेय 300/- शुल्क आकारण्यास मान्यता देणेबाबत व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.सदरील विषय दिनांक 1 ऑक्टोबर 2015 च्या विद्वत परिषदेच्या बैठकीत चर्चा करण्यासाठी ठेवण्यात आला.

सदरील विषय विद्वत समितीच्या बैठकीत चर्चा करण्यासाठी ठेवण्यात आला होता.

**वि.प.ठराव.** यापूर्वी गुणपत्रिका व पासिंग सर्टिफिकेट यासाठी रुपये 300/- आकारण्यात येत आहेत. तसेच मायग्रेशनसाठीही रुपये 300/- आकारण्यात येत आहे. महाराष्ट्रातील यावर्षीच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करता तसेच विद्यापीठाच्या गरजू विद्यार्थ्यांना कमीत कमी प्रवेश शुल्कात ज्ञानगंगा घरोघरी पोहचविण्यासाठी, शिक्षण देण्याचा विचार विद्यापीठाने केला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीसाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गुणपत्रिका, पासिंग सर्टिफिकेट, मायग्रेशन एकत्रितपणे पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे यापूर्वीप्रमाणे फक्त गुणपत्रिका, पासिंग सर्टिफिकेटसाठी रुपये 300 आकारावेत, मायग्रेशनसाठी शुल्क आकारणी करण्यात येऊ नये. त्यामुळे विद्यार्थ्यांना कमी शुल्कात शिक्षण घेता येईल. सदरील विषय वित्त समितीमध्ये ठेवण्यात यावा.

**वि.स.ठराव -** दिनांक 1.10.2015 रोजीच्या विद्वत परिषद सभेच्या सहपत्रातील शिफारशींवर सविस्तर चर्चा करण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आले.

1) Rehabilitation Council of India ,New Delhi च्या गाईडलाईन नुसार आर्थिक बाबींना शिक्षणक्रम समन्वयकांच्या दिनांक 25.09. च्या पत्रानुसार 2015 मंजूरी देण्याबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.
2) बी ए.ग्राहक सेवा या शिक्षणक्रमाच्या सुधारित शुल्क रचनेस मान्यतेस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.
3) विद्यापीठ परिसरात बांधण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण स्मृती दालनाच्या निर्मिती खर्चाबाबत सर्व प्रकारच्या विहित प्रक्रिया व टेंडर प्रक्रिया पूर्ण कराव्यात तसेच Multi Tasking Museum Assistant एजन्सी मार्फत घेण्यास व देखभालीसाठी रु. 5 लक्ष अंदाजपत्रकीय तरतूद करण्यास मान्यतेस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.
4) विद्यापीठात सुरु असलेल्या विविध अध्यासनामार्फत कोणकोणती कामे करावीत यासंदर्भात संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा यांनी सादर केलेल्या टिपणीबाबत व सदरील विषयातील टिपणीमध्ये उल्लेख केलेल्या सूचना यांस मंजूरी देण्यास व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.
5) IIT / JEE साठी व्हीएलसी मार्फत प्रशिक्षण पुरविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यतेस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.
6) विविध परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे ऑनलाईन डिजीटल मूल्यमापनाच्या रुपये 4/- प्रती उत्तरपुस्तिका

| | | |
|---|---|---|
| | | भाडे देण्याच्या ठरावाची नोंद घेण्यात आली व त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>7) शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून पासिंग सर्टिफिकेट, गुणपत्रिका, मायग्रेशन सर्टिफिकेट साठी रू. 300/- एकत्रितपणे आकारण्याबाबत केलेल्या ठरावाची नोंद घेण्यात आली व त्यास व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव : वित्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्वत परिषदेतील वरील 1 ते 7 विषयास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.41<br>वि.स.बैठक<br>5.4.8 | यशभारती (इस्त्रो प्रकल्प) च्या इस्त्रो उपग्रहाद्वारे महाराष्ट्रातील विविध विभागीय/अभ्यास केंद्रांना तसेच यशदा आणि MSBTE च्या VLC केंद्रांना सर्वसमावेशक देखभाल करारांतर्गत सेवा पुरविण्यासाठी वित्तीय वर्ष 2015-16 च्या खर्चास मान्यता मिळणेबाबत....<br>(टिपणी : Infinium (India) Ltd., Ahmedabad यांचेशी Extended C-Band Hub, (OEM M/s. VIASAT), Teaching Ends of Maharashtra Edusat Network including UPS (Nashik & Pune), Satelite Interactive Terminals (SIT) संदर्भात तीन वर्षांचा सर्वसमावेशक वार्षिक देखभाल करार करण्यात आलेला आहे. या करारांतर्गत सेवा पुरविल्याबद्दल तृतीय वर्षाकरिता रक्कम रु.75,85,000/- इतका खर्च प्रस्तावित केलेला आहे. सदरच्या खर्चास मान्यता मिळावी यासाठी प्रस्ताव सादर (सोबत सहपत्र K)<br>**वि.स.ठराव** - यशभारती (इस्त्रो प्रकल्प) च्या तीन वर्षाकरिता प्रस्तावित केलेल्या रु.75,85,000/- खर्चास व्यवस्थापन मंडळास मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव : वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठाने Infinium (India) Ltd., Ahmedabad यांच्याशी तीन वर्षासाठी सर्व समावेशक वार्षिक देखभाल करार केलेला आहे. या करारांतर्गत यशभारतीच्या इस्त्रो उपग्रहाद्वारे महाराष्ट्रातील विविध विभागीय व अभ्यासकेंद्रांना तसेच यशदा आणि MSBTE च्या VLC केंद्रासाठी सेवा पुरविण्याबाबत तीन वर्षासाठी प्रस्तावित रु.75,85,000/- खर्च अपेक्षित आहे. यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.42<br>वि.स.बैठक<br>5.4.9 | उपग्रह केंद्र (Satellite Interactive Terminals (SIT) देखभाल खर्चास मान्यता मिळणेबाबत.....<br>(टिपणी : Infinium (India) Ltd., Ahmedabad यांचेशी Extended C-Band Hub, (OEM M/s. VIASAT), Teaching Ends of Maharashtra Edusat Network including UPS (Nashik & Pune), Satelite Interactive Terminals (SIT) संदर्भात तीन वर्षांचा सर्वसमावेशक वार्षिक देखभाल करार करण्यात आलेला आहे. या करारान्वये विद्यापीठांतर्गत सुरु असलेल्या अभ्यास केंद्र / विभागीय केंद्र येथील उपग्रह Satellite Interactive Terminals (SIT) च्या देखभालीसाठी रु.20,28,000/- खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मान्यता मिळावी यासाठी प्रस्ताव सादर.(सोबत सहपत्र L)<br>**वि.स.ठराव** - उपग्रह केंद्र (Satellite Interactive Terminals (SIT) देखभाल खर्च रु.20,28,000/- यास मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार विद्यापीठाने Infinium (India) Ltd., Ahmedabad यांच्याशी तीन वर्षासाठी सर्व समावेशक वार्षिक देखभाल करार केलेला आहे. या करारान्वये विद्यापीठांतर्गत सुरु असलेल्या अभ्यासकेंद्र / विभागीय केंद्र येथील उपग्रह केंद्र (Satellite Interactive Terminals (SIT) देखभाल खर्च रु. 20,28,000/- खर्च अपेक्षित आहे. यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.43<br>वि.स.बैठक<br>5.4.10 | **दिनांक 6 मे व 24 ऑगस्ट 2015 रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या खालील ठरावांना मंजूरी देणेबाबत....**<br>1. पुणे विभागीय केंद्राच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव<br>(टिप्पणी : विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रासाठी पुणे महानगरपालिकेकडून 30 वर्षाच्या करारावर जागा मिळालेली आहे. सदरहू जागेवर विद्यापीठाचे पुणे विभागीय कार्यालयासाठी इमारत व कम्युनिटी कॉलेजसाठी इमारत बांधकाम करण्याचे प्रस्तावीत आहे. सदरहू कामासाठी अर्कि. मनोज जाधव मे. अविष्कार आर्किटेक्टस अँड इंजिनिअर, अहमदनगर यांची आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अर्कि.श्री जाधव यांनी विद्यापीठाच्या सुचनेनुसार पुणे विभागीय कार्यालयाची इमारत व कम्युनिटी |

31L

कॉलेजसाठी इमारत बांधकामाचे रु.13.10 कोटीचे अंदाजपत्रक बांधकाम कक्षास सादर केलेले आहे. सदरहू अंदाजपत्रक मा.बांधकाम समिती सदस्यांच्या विचारार्थ व प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर. (सोबत जोडलेले परिशिष्ट C1)

<u>ठराव क्र. अ/400/2015/03.2</u>
पुणे विभागीय केंद्राच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्राकावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की अर्कि.जाधव यांनी विद्यापीठाच्या सुचनेनुसार पुणे विभागीय कार्यालयाची इमारत व कम्युनिटी कॉलेजसाठी इमारत बांधकामाचे रु. 13.10 कोटीचे अंदाजपत्रकास बांधकाम समितीच्या वतीने मान्यता देवून मा.वित्त समिती व मा.व्यवस्थापन मंडळ यांच्या मान्यतेसाठी सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

2. विद्यापीठाच्या परीक्षा गोडाऊनमध्ये पॅलेट रॅक बसविण्याच्या कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्ता बांधकाम समितीच्या निर्णयास्तव सादर

टिप्पणी : विद्यापीठाच्या प्रांगणात परीक्षा गोडाऊनमध्ये पॅलेट रॅक बसविण्याच्या कामासाठी शासन निर्णयाप्रमाणे ई-निविदा प्रणाली वापरून दि.11 फेब्रुवारी 2015 रोजी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 07 (सात) पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत 04 (चार) पुरवठाधारकांनी ई-निविदाव्दारे निविदा भरली होती. नियमानुसार सदरहू निविदा विद्यापीठाच्या ई-निविदा उघडण्याच्या समितीसमोर उघडून सर्व निविदा धारकांच्या तांत्रिक निविदांची प्रिंट काढण्यात आली व त्याचा तौलनीक तक्ता तयार करुन तांत्रिक निविदांची तपासणी केली असता 04 (चार) पुरवठाधारकांपैकी मे. समर स्टील इंस्टि.जळगांव यांनी निविदा अपात्र ठरवून उर्वरीत 03 (तीन) पुरवठाधारक तांत्रिक निविदेत पात्र ठरले. त्यानुसार तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या पुरवठाधारकांच्या व्यापारी निविदा समिती सदस्यांसमोर उघडून तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर मे. Sumech Storage Systems, Pune यांनी संपूर्ण Pallet Racking सिस्टीम रु. 40,65,774/- सर्व करासहीत दर आलेला आहे. सर्वात कमी दर असलेले मे. Sumech Storage Systems, Pune यांना मा.कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार दिलेल्या दरापेक्षा अजून दर कमी करण्याबाबत कळविले होते त्यानुसार त्यांनी दर कमी करण्याबाबत पत्र दिलेले आहे. सदरहू पत्र, तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.) (सोबत जोडलेले परिशिष्ट I 1 ते I 3)

<u>ठराव क्र. अ/400/2015/04.1</u>
विद्यापीठाच्या परीक्षा गोडाऊनमध्ये पॅलेट रॅक बसविण्याच्या कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर असलेले मे. Sumech Storage Systems, Pune ह्यांनी त्यांचे दि. 05 मे 2015 चे पत्रानुसार एकूण रक्कम रु. 40,65,774/- वर दिलेली सुट रु. 12000/- वजा जाता रु. 40,53,771/- सर्व करासहीत निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्य आदेश निर्गमित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले व मा.व्यवस्थापन मंडळ यांच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

3. विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्राच्या इमारत दुरुस्ती कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्ता बांधकाम समितीच्या निर्णयास्तव सादर.

(टिप्पणी : विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्राच्या इमारत दुरुस्ती कामासाठी शासन निर्णयाप्रमाणे ई-निविदा प्रणाली वापरून दि.14 मार्च 2015 रोजी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीपर्यत एकूण 03 पुरवठाधारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या त्यातून मुदतीपर्यत तीनही पुरवठाधारकांनी ई-निविदाव्दारे निविदा भरली होती. नियमानुसार सदरहू निविदा विद्यापीठाच्या ई-निविदा उघडण्याच्या समितीसमोर उघडून सर्व निविदा धारकांच्या तांत्रिक निविदांची प्रिंट काढण्यात आली व त्याचा तौलनीक तक्ता तयार करुन तांत्रिक निविदांची तपासणी केली असता तीनही पुरवठाधारक तांत्रिक निविदेत पात्र ठरले. त्यानुसार तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या पुरवठाधारकांच्या व्यापारी निविदा समिती सदस्यांसमोर उघडून तौलनीक तक्ता तयार करण्यात आला. तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर मे. Nikhil Parikh, Kolhapur यांनी कोल्हापूर विभागीय केंद्राच्या दुरुस्ती निविदेत नमुद केलेल्या रु.17,48,991/- रक्कमेपेक्षा 5.55 टक्के अधिकने काम करण्याबाबत निविदा भरलेले आहे. सर्वात कमी दर असलेले मे. Nikhil Parikh, Nashik यांना मा.कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार दिलेल्या दरापेक्षा अजून दर कमी करण्याबाबत कळविले होते त्यानुसार

| | | |
|---|---|---|
| | | त्यांनी दर कमी करण्याबाबत पत्र दिलेले आहे. सदरहू पत्र, तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा तौलनीक तक्ता बांधकाम समिती सदस्यांच्या निर्णयास्तव सविनय सादर.) (सोबत जोडलेले परिशिष्ट K 1 ते K<br>ठराव क्र. अ/400/2015/04.3<br>विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय केंद्राच्या इमारत दुरुस्ती कामाच्या तांत्रिक व व्यापारी निविदा तौलनीक तक्तावर समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की तौलनीक तक्तानुसार सर्वात कमी दर असलेले मे. Nikhil Parikh, Kolhapur. ह्यांनी त्यांचे दि. 04 मे 2015 चे पत्रानुसार एकूण कामाचे अंदाजपत्रक रु. 17,48,991/- रक्कमेपेक्षा 5.55 टक्के अधिकने ऐवजी 4.95 टक्के अधिकने निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्य आदेश निर्गमित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले व मा.व्यवस्थापन मंडळ यांच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. (सोबत सहपत्र M)<br>**वि.स.ठराव** - बांधकाम समितीच्या ठरावास व्यवस्थापन मंडळास मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले<br>**व्य.मं.ठराव : सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.44<br>वि.स.बैठक<br>5.4.11 | मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या विविध शिक्षणक्रमांच्या विकसन/पुनर्नचनेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत....<br>(टिपणी: मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमार्फत खालील शिक्षणक्रमांच्या विकसनाचे/पुनर्रचनेचे काम हाती घेण्यात आलेले आहे. यासाठी तज्ज्ञ सल्लागारांची समिती, बैठका, लेखक, संपादक यांची निवड व त्यांचे मानधन इ. साठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.<br>1) बी.ए. (द्वितीय वर्ष) शिक्षणक्रम पुनर्रचना<br>2) बी.ए. (तृतीय वर्ष) शिक्षणक्रम पुनर्रचना<br>3) एम.ए. शिक्षणक्रम विकसिन<br>4) प्रथम वर्ष बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पुनर्रचना<br>5) एम.ए. पब्लिक अँडमिनिस्ट्रेशन<br>6) एम.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पुनर्रचना<br>7) MSW<br>वरील खर्च विद्याशाखेच्या सन 2015-16 च्या अंदाजपत्रकातील नवीन शिक्षणक्रमांची निर्मिती या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल. मात्र या लेखाशिर्षात रु.40,00,000/- इतकीच तरतूद असल्याने ही तरतूद रु. 5 कोटी इतकी करावी लागणार असल्याने प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.<br>(सोबत सहपत्र N)<br>**वि.स.ठराव** - मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या विविध शिक्षणक्रमांच्या विकसन/पुनर्नचनेसाठी सन 2015-16 च्या अंदाजपत्रकातील नवीन शिक्षणक्रमांची निर्मिती या लेखाशिर्षाखाली रु. 5 कोटी तरतूद करण्यास मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.45<br>वि.स.बैठक<br>5.4.12 | कृषि विज्ञान विद्याशाखेच्या 8 शिक्षणक्रमांचे रिव्हिजन करण्यास येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत....<br>(टिपणी : कृषि विज्ञान विद्याशाखेमार्फत 8 शिक्षणक्रमांच्या रिव्हिजनचे काम जानेवारी 2015 पासून सुरु आहे. तसेच पुरवणी पुस्तिका विकसित करण्यात येत असून लेखन मानधन, संपादन मानधन, टायपिंग मानधन इ. साठी रु.11,45,500/- खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मंजुरी मिळणेस प्रस्ताव सादर.(सोबत सहपत्र O)<br>**वि.स.ठराव** - कृषि विज्ञान विद्याशाखेच्या 8 शिक्षणक्रमांचे रिव्हिजन करण्यास येणाऱ्या रु.11,45,500/- खर्चास मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले<br>**व्य.मं.ठराव: सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.46<br>वि.स.बैठक<br>5.4.13 | सन 2015-16 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ करणेबाबत.....<br>(टिपणी : विद्यापीठाला 1 एप्रिल 2015 पासून समान लेखासंहिता लागू झालेली असल्याने यातील तरतूदी लक्षात घेऊन विद्यापीठाचे सन 2015-16 या वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. या अंदाजपत्रकातील काही लेखाशिर्ष नव्याने तयार करण्यात आल्याने त्यातील तरतूदी कमी पडत असल्याचे लक्षात येत आहे. त्यादृष्टीने सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार लेखाशिर्षामध्ये वाढीव तरतूदी कराव्या लागणार असून मान्यतेस्तव सादर.(सोबत परिशिष्ट सहपत्र P) |

| | | |
|---|---|---|
| | | **वि.स.ठराव** - सन 2015-16 आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ करण्यास तसेच यापुढेही आवश्यक असेल तेथे अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ करण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना द्यावेत याबाबत मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव : सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.47<br>वि.स.बैठक<br>5.4.14 | Awareness Courses in Cyber Security शिक्षणक्रम IQSS Share बाबत....<br>(टिपणी : सहयोग व विशेष प्रकल्प केंद्रामार्फत Awareness Course in Cyber Security हा शिक्षणक्रम 20.2.13 पासून राबविला जात होता. विद्वत परिषद आणि व्यवस्थापन मंडळाच्या ठरावाप्रमाणे सदरचा शिक्षणक्रम डिसेंबर 2014 पासून निरंतर शिक्षण विद्याशाखेमार्फत राबविला जात आहे.<br>सदरच्या शिक्षणक्रमाचे शुल्क रचना आणि IQSS या संस्थेस त्यांचा वाटा प्रदान करण्याची पद्धत या बाबत दि. 5.6.13 च्या मा.कुलगुरूंनी मंजूर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही केली जात होती. (त्यानुसार शिक्षणक्रम शुल्क प्रति विद्यार्थी रु.1,800/- इतका असून त्यातून विद्यापीठाचा हिस्सा रु.540/- आणि IQSS चा हिस्सा रु.900/- आहे. अभ्यास केंद्र शुल्क रु.360/- अभ्यास केंद्राकडून परस्पर वसूल केले जाते. विद्यापीठाकडे रु.1,440/- डीडी पाठविला जातो. त्यानंतर IQSS चा वाटा विद्यापीठाकडून प्रदान केला जातो.) तथापि शुल्क निश्चिती आणि IQSS ला शुल्काचा वाटा देण्याबाबतच्या प्रस्तावास सदरचा विषय वित्त समितीपुढे सादर.(सोबत सहपत्र Q)<br>**वि.स.ठराव** - Awareness Courses in Cyber Security शिक्षणक्रम शुल्क निश्चितीस व IQSS चा वाटा प्रदान करण्यास मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव : सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.48<br>वि.स.बैठक<br>5.4.15 | सन 2015-16 करिता विविध छपाई कामांसाठी आवश्यक कागद खरेदी खर्च रु.80,00,000/- मंजूरीस्तव ...<br>(टिपणी : निर्मिती अधिकारी, ग्रंथनिर्मिती केंद्र यांनी सन 2015-16 या शैक्षणिक वर्षाकरिता विविध शिक्षणक्रमांच्या पाठ्यपुस्तकांच्या प्रथम तसेच पुनर्मुद्रणासाठी आणि विविध पुस्तकेतर छपाई कामांसाठी आवश्यक अशा 04 प्रकारच्या कागदांच्या खरेदीसाठी येणाऱ्या अंदाजे रु.80,00,000/- खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर खर्चास व निविदा तयार करणे, जाहिरात देणे, इ. मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर.)(सोबत सहपत्र R)<br>**वि.स.ठराव** - सन 2015-16 करिता विविध छपाई कामांसाठी आवश्यक कागद खरेदी खर्च रु.80,00,000/- व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.49<br>वि.स.बैठक<br>5.4.16 | विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन मर्यादेनुसार सुधारित वाहन खरेदी अग्रिम योजनेबाबत..<br>(टिपणी : विद्यापीठ कर्मचाऱ्यांना वाहन खरेदी साठी व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. ए-100/99/182 नुसार सन 1999 पासून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांप्रमाणे वाहन अग्रीम देण्यात येतो. शासन निर्णय दिनांक 20 ऑगस्ट 2014 नुसार सुधारित वेतन मर्यादेनुसार सुधारित अग्रिम देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.)(सोबत सहपत्र S)<br>**वि.स.ठराव** - विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन मर्यादेनुसार सुधारित वाहन खरेदी अग्रिम योजनेस व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 20 ऑगस्ट 2014 नुसार, विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन मर्यादेनुसार वाहन खरेदी अग्रिम योजनेस मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.50<br>वि.स.बैठक<br>5.4.17 | जानेवारी 2016 मध्ये 85 आय.टी.आय. अप्रेंटिसेसची भरती करणेबाबत....<br>(टिपणी : विद्यापीठात 1998 पासून दैनंदिन कामकाजासाठी शिकाऊ उमेदवार अधिनियम 1961 अंतर्गत 85 आय.टी.आय. प्रशिक्षणार्थींची एक वर्षासाठी नियुक्ती केली जाते. अशा 85 प्रशिक्षणार्थिंची भरती जानेवारी 2016 मध्ये भरती प्रक्रिया पूर्ण करण्यास व शासनामार्फत वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या किमान वेतन दरानुसार आय.टी.आय. प्रशिक्षणार्थिंना विद्यावेतन अदा करण्यास विषय मान्यतेसाठी सादर.(सोबत सहपत्र T)<br>**वि.स.ठराव** - जानेवारी 2016 मध्ये 85 आय.टी.आय. अप्रेंटिसेसची भरती करणेबाबतच्या प्रस्तावास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारस करावी असे ठरले<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार जानेवारी 2016 मध्ये 85 आय.टी.आय. अप्रेंटिसेसची भरती करण्यास व शासनामार्फत वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या** |

| | | |
|---|---|---|
| | | **किमान वेतन दरानुसार आय.टी.आय. प्रशिक्षणार्थिंना विद्यावेतन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.51<br>वि.स.बैठक<br>5.4.18 | PG Diploma in E-Education in Digital Society (PG-DEEDS) या शिक्षणक्रमाचे शुल्क निश्चिती आणि या शुल्काची YCMOU व MKCL या मध्ये विभागणीस मंजूरीबाबत....<br>(टिपणी : PG-DEEDS हा शिक्षणक्रम नव्यानेच शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत सन 2015-16 च्या तुकडीपासून सुरु करण्यात येत आहे. एकविसाव्या शतकातील शिक्षक तयार करण्याची नाविन्यपूर्ण योजना आहे. मुक्त विद्यापीठातील विविध शिक्षणक्रमांच्या समंत्रकांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक शिक्षक तयार करण्यासाठी हा शिक्षणक्रम उपयुक्त आहे. त्यासाठी YCMOU व MKCL Share 30% - 70% अशी असेल. या शिक्षणक्रमासाठी एकूण 500 समंत्रकांना दरवर्षी विनाशुल्क प्रवेश देण्यात येईल. त्यातील 250 समंत्रक मुक्त विद्यापीठ व 250 समंत्रक एम.के.सी.एल. कडून भरण्यात येतील. मुक्त विद्यापीठातर्फे प्रवेश घेतलेले समंत्रक अभ्यासकेंद्रांवर समंत्रक म्हणून कार्यरत असतील. या समंत्रकांचा वयोगट वर्ष 45 च्या दरम्यान असेल. या समंत्रकांकडून त्यांच्या व इतर अभ्यास केंद्रांवरील समंत्रकांना प्रशिक्षण देण्यास तयार आहे असे हमीपत्र घेण्यात येईल. तिसऱ्या वर्षी शुन्य किंमत या पद्धतीने विद्यार्थ्यांकडून रु.500/- घेवून हा शिक्षणक्रम राबविण्यात येईल.<br>मुक्त विद्यापीठाला PG Diploma in E-Education in Digital Society या शिक्षणक्रमाच्या दोन वर्षासाठी रु.42,00,000/- (प्रति वर्ष रु.21,00,000/-) खर्च करावा लागेल. या खर्चास व शिक्षणक्रम योजना राबविण्यास मान्यतेस्तव सादर.) (सोबत सहपत्र U)<br>**वि.स.ठराव** - PG Diploma in E-Education in Digital Society (PG-DEEDS) या शिक्षणक्रमाचे शुल्क निश्चिती आणि रचना याबाबत खालीलप्रमाणे मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले. (१) YCMOU व MKCL या मध्ये विभागणीस तसेच दोन वर्षासाठी रु.42,00,000/- (प्रति वर्ष रु.21,00,000/-) कराव्या लागणाऱ्या खर्चास तसेच दरवर्षी 250+250 असे अनुक्रमे YCMOU व MKCL चे एकूण 500 समंत्रकांना प्रशिक्षण देण्यास मंजूरी. (२) तिसऱ्या वर्षी शुन्य किंमत या पध्दतीने विद्यार्थ्यांकडून रुपये 500/- घेऊन हा शिक्षणक्रम राबविण्यास व शुल्क आकारण्यास मंजूरी. (३) शुल्क रचना मान्य करण्यास मंजूरी<br>**व्य.मं.ठराव : सदरचा विषय पुढे ढकलण्यात आला.** |
| | 150.4.52<br>वि.स.बैठक<br>5.4.19 | विशेष बी.एड. शिक्षणक्रमाचे शुल्क रु.35,000/- निश्चित करणे तसेच या शुल्काचे विभाजन 50 टक्के विद्यापीठ, 40 टक्के अभ्यास केंद्र व 10 टक्के शुल्क RCI करणेस मंजूरीबाबत...<br>(टिपणी : RCI च्या दिनांक 26.6.2015 च्या बैठकीत विशेष बी.एड. शिक्षणक्रमाचे शुल्क रु.7,000/- प्रति सत्राप्रमाणे 5 सत्रांचे एकूण रु.35,000/- शुल्क आकारणी करावी आणि या शुल्काचे विभाजन 50 टक्के विद्यापीठ, 40 टक्के अभ्यास केंद्र व 10 टक्के शुल्क RCI करणेस करावी असे ठरले त्यानुसार विषय मंजूरीस्तव सादर.(सोबत सहपत्र V)<br>**वि.स.ठराव** - सदर विषय विषय क्र. 5.4.7 मध्ये विद्वत परिषदेमार्फत आलेला असल्याने व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेस्तव शिफारस करण्यात आली.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे विशेष बी.एड शिक्षणक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कास व या शुल्काचे विभाजन करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.53<br>वि.स.बैठक<br>5.4.20 | नवीन अभ्यास केंद्र मान्यता प्रक्रिया शुल्काचे नियम ठरविणेबाबत...<br>(टिपणी : नवीन अभ्यास केंद्र मान्यतेचे नियम निश्चित करणे व प्रक्रिया शुल्काबाबत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर.)(सोबत सहपत्र W)<br>**वि.स.ठराव** - नवीन अभ्यास केंद्र मान्यता प्रक्रिया शुल्क नियमांना मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळास शिफारस करावी असे ठरले.<br>**व्य.मं.ठराव: वित्त समितीने केलेल्या शिफारसीनुसार नवीन अभ्यास केंद्र देताना करण्यात आलेले नियम व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या प्रक्रिया शुल्कास मान्यता मान्यता देण्यात आली.** |
| | 150.4.54<br>वि.स.बैठक<br>5.4.21 | विद्यापीठ प्रागणात तसेच नाशिक व पुणे विभागीय केंद्रावर बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही.कॅमरा खर्च रु. 11,65,000/- कार्योत्तर मान्यता व इतर उर्वरीत सर्व विभागीय केंद्रावर सी.सी.टी.व्ही.कॅमरे बसविण्यासाठी येणारा अंदाजीत खर्च रु. 6,50,000/- अशा एकूण खंर्चास रु. 18,00,000/- ला मान्यता मिळणेबाबत...<br>(टिपणी : विद्यापीठ आवारात सी सी टी व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी रु. 8,26,015/- मा.कुलगुरु यांची |

| | | |
|---|---|---|
